
नाचसे बढ़के और
कोई चीज नहीं है।
गोपीकृष्ण

शनिवार ३ ऑक्टोबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| र्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| ंक : तेविसावा | **श्री. ग. माजगावकर** | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| ंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


# सप्रेम नमस्कार....

◻ आपल्या बुधवारच्या अंकातून प्रसिद्ध होणारी 'रोखलेल्या बंदुका...' ही लेखमाला अतिशय आवडली. खरोखरच अप्रतिम. विशेषतः देशद्रोहीपणाचा छाप बसलेल्या चळवळीचे निर्भीड, स्पष्ट व प्रत्यक्ष निरीक्षण करून ते प्रसिद्ध करण्याचे धाडस कौतुकास्पद. त्याचबरोबर श्री. अनिल बर्वे ह्यांच्या परिश्रमाबद्दल त्यांचे अभिनंदन. नक्षलवादी चळवळ ही राज्यकर्त्यांच्या नादानपणाचे अपत्य असून त्यामुळे निर्माण झालेला उद्रेक आहे. हा उद्रेक दंडुकेशाहीने थोपवता येणार नाही. प्रांतीय चळवळीत समरस झालेल्या आजच्या आम्हा मराठी तरुणांना ह्या चळवळीने देशातील चालू परिस्थितीचे खरे स्वरूप नजरेस येत आहे.

ह्या चळवळीतून अर्थात पुढे काय होणार हा प्रश्न निर्माण होतो. बलिदानाच्या ह्या चळवळीत कायम स्वरूपाचे कार्य घडू शकेल काय ? ह्यातूनच उद्या सुसंघटित असा क्रांतीचा मार्ग तयार होईल का ?

लेखमालेची सुरुवात मार्क्सच्या वाक्यातून केलेली समर्पक वाटली.

२३ सप्टेंबर, १९७० — प्रकाश का. छत्रे, मालाड

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

# अल् फतेह अरब गनिमी संघटना

विजय वैद्य

अमेरिकेने सुचवलेल्या शांतता योजनेला सोव्हिएट युनियनने पाठिंबा दिला आणि इस्त्रायल, संयुक्त अरब प्रजासत्ताक व जॉर्डन या देशांनीही थोडेफार आढेवेढे घेत घेत शेवटी ही योजना स्वीकारल्याने ९० दिवसांच्या युद्धबंदी काळात योग्य त्या वातावरणात वाटाघाटी होऊन पश्चिम आशियाचा प्रश्न मार्गी लागेल अशी चिन्हे दिसत असतानाच अरब गनिमांनी या योजनेला मान्यता द्यायचे नाकारले. १ सप्टेंबर रोजी जॉर्डनचे राजे हुसेन यांच्या खुनाचा प्रयत्न झाला. (या आधीही त्यांना मारण्याचे काही प्रयत्न झाले होते). त्याच दिवशी अम्मानमध्ये जॉर्डनचे सैन्य आणि गनीम यांच्यात यादवी युद्धाला तोंड लागले होते. अशा रीतीने वातावरणातील तंगपणा जाणवत असतानाच ७ सप्टेंबर रोजी 'पॅन ॲम', 'स्विस एअर', 'ट्रान्सवर्ल्ड एअर लाईन्स' व इस्त्रायली 'अल् एल्' या विमान कंपनीचे अशी चार प्रचंड जेट विमाने गनिमांनी पळवून नेल्याने जगात प्रचंड खळबळ माजली. सर्व जगाची नजर पुनःश्च पश्चिम आशियाकडे लागून राहिली. या विमानातील ओलीस ठेवलेल्या बहुतेक प्रवाशांची सुटका झाल्याने वातावरण निवळत होते, तेवढ्यात १६ सप्टेंबर रोजी पॅलेस्टॅनियन गनिमांनी जॉर्डनच्या सरकारी फौजांवर हल्ला केला. जॉर्डनच्या राजाने, ब्रिटनमध्ये लष्करी शिक्षण घेतलेल्या फिल्ड मार्शल हबिस मजाली यांच्याकडे राज्यकारभार सोपवला. कालपर्यंतच्या बातम्यांवरून असे दिसते की गेल्या सहा दिवसांच्या यादवी युद्धात एकूण १० हजार अरब ठार झाले असून जॉर्डनची राजधानी अम्मान अर्धीअधिक नष्ट झाली आहे. हे सर्व जरी जॉर्डनची राजेशाही नष्ट करण्यासाठी चाललेले असले तरी ही गनिमी शक्ती निर्माण झाली ती इस्त्रायल विरुद्ध लढून पॅलेस्टाईनच्या मुक्तीसाठी.

पॅलेस्टाईन 'आमची भूमी आहे' असा ज्यूंचा दावा असून दुसऱ्या महायुद्धात वाताहत झालेल्या ज्यू लोकांना स्वतःचे राज्य असावे असे वाटू लागले आणि बड्या राष्ट्रांनी त्यांना मध्यपूर्वेत पॅलेस्टाईन येथे ज्युईश राज्य निर्माण करण्यासाठी ग्रीन

सिग्नल दिला. इस्त्रायलचा जन्म झाला खरा पण हजारो अरबांना पॅलेस्टाईनमधून परागंदा व्हावे लागले. हे सर्व निर्वासित इजिप्त आणि जॉर्डन या देशात प्रामुख्याने आले. ही निर्मिती अरबांना पाचरीप्रमाणे वाटू लागली. यातूनच पुढे राजकारण रंग लागले, शस्त्रे खणखणू लागली आणि मध्यपूर्व अस्वस्थ झाली ती आजतागायत.

'फतेहची दैदिप्यमान क्रान्तिकारी चळवळ अविरतपणे सर्वत्र चालू आहे. हे तुफान आहे. क्रान्तीचे हे तुफान घराघरातून आणि खेड्याखेड्यातून घोंघावत आहे–' प्रत्येक रात्री 'व्हाइस ऑफ अल् फतेह' अक्षरशः अविरतपणे ही बांग देत आहे. हा आवाज प्रत्येक रात्री जिवावर उदार होऊन इस्त्रायलची सरहद्द ओलांडून तिथे हल्ले करणाऱ्या आणि प्रसंगी मृत्यूला कवटाळणाऱ्या अरब गनिमांसाठी (कमांडोज) असतो; गारठून टाकणाऱ्या थंडीत अम्मान शहराबाहेरील तंबूत कुडकुडणाऱ्या निर्वासितांसाठी असतो; दमास्कसमधील दिवाणखान्यात कॉफी पीत बसणाऱ्या अरबांसाठी असतो, हा आवाज असतो बैरुत विद्यापीठात शिकणाऱ्या तरुणांसाठी आणि तरुणींसाठी.

इस्त्रायलबरोबरचे युद्ध या ना त्या प्रकारे रोजच चालू असते. मध्ययुगीन धर्म युद्धे (क्रुसेडस्) चालू असताना ज्याप्रमाणे 'एव्हरी डे ब्रॉट फोर्थ चान्स ए नाइट' ('Every day brought forth chance a knight') युद्धाचा प्रत्येक दिवस पराक्रमी शिलेदार उजेडात आणण्याची कामगिरी करीत होता, त्याचप्रमाणे पश्चिम आशियातील रात्रीही रोज एक एक मोहरा उदयाला आणतात. 'रेडिओ अल् फतेह' त्यांच्या प्रचारात्मक कार्यक्रमातून मधूनच सांकेतिक भाषेत संदेश देतो– 'एम्. एच्...दि बर्ड इज बॅक इंन केज' अटेंशन ग्रीन लायन. दि गिफ्ट हॅज बिन रिसिव्हड.'

संदेश मिळताच 'फतेह'चे गनीम जॉर्डन नदी पार करून इस्त्रायली प्रदेशात जातात, एखादा सुरुंग पेरतात, इस्त्रायली गस्ती तुकडीवर हल्ला करतात वा एखादे ग्रेनेड त्यांच्यावर टाकून पुनः घरच्या मार्गाकडे वळतात. पण ते तितके सोपे नसते. अनेक जण जागरूक इस्त्रायली सुरक्षा दलाच्या माऱ्याला बळी पडतात, तर कित्येक जण पकडले जातात. मात्र त्यांचे मोल अरब जगात वाढते. मृत्यू पावलेले हुतात्मे होतात. सबंध अरब जगतात त्यांच्या शौर्याच्या गाथा गाइल्या जातात. त्यांचे फोटो छापले जातात. त्यांच्या पराक्रमाच्या कथा कर्णोपकर्णी होतात. अरबांच्या लढ्यासाठी मरणारे हे 'वीर' अल्लाचे प्रेषित असून ते सरळ स्वर्गात जातात असे मानले जाते.

'अल् फतेह' (अल् म्हणजे दि. व फतेह म्हणजे विजय) खरा अरबी शब्द आहे 'हराकत अल् ताहरिर अल् फलास्तिन.' 'मुव्हमेंट फॉर दि लिबरेशन ऑफ पॅलेस्टाईन' याची अद्याक्षरे एच्. टी. एफ्. घेतली तर त्यापासून होणाऱ्या अरबी शब्दाचा अर्थ आहे 'मृत्यू'. ही आद्याक्षरे उलटी पालटी केली– एफ्. टी. एच्. तर त्याचा उच्चार

'Fath' असा होतो व त्यावरून 'फतेह' हा शब्द तयार झाला आहे) ही इतर काही अरब संघटनांप्रमाणेच एक गुप्त संघटना आहे, मात्र इतरांपेक्षा ती अधिक मोठी व प्रसिद्ध आहे. ज्यूंच्या दृष्टीने हे अरब गनीम 'दहशतवादी व 'दरोडेखोर' आहेत तर अरब जगताचे ते 'स्वातंत्र्ययोद्धे' आहेत. जगात मात्र ते फेद‍िन या नावाने ओळखले जातात (याचा अर्थ आहे 'स्वार्थत्यागी माणसे') याच निरनिराळ्या गुप्त संघटना मध्यपूर्वेतील युद्ध धगधगत ठेवत असतात. कधीमधी त्यांच्यातच आपापसात जुगलबंदी चालू होते. या मंडळींना ६७ मधील पराजय संपूर्णपणे मान्य नाही. त्यांच्यापुढे एकच ध्येय आहे 'बस्स, इस्रायल नष्ट करायचेच.' अरब जनमानसात त्यांची प्रतिमा चांगलीच ठसलेली असून 'संयुक्त अरब गण राज्या'चे राष्ट्राध्यक्ष कर्नल अब्दुल गमाल नासेर व इतर कोणताही अरब नेता ही प्रतिमा पुसून काढायला आज असमर्थ आहे. किंबहुना त्यांची प्रतिमा आज अरब जगतात ढासळण्याची वेळ आलेली आहे. पाश्चिमात्यांकडे झुकलेल्या जॉर्डनच्या हुसेन राजाला पदच्यूत केल्याशिवाय आम्ही यादवी युद्ध थांबवणार नाही' ही त्यांची अलीकडची घोषणाच याची साक्ष देऊ शकेल. यातही महत्त्वाची गोष्ट अशी. जॉर्डनची राजधानी अम्मान येथूनच 'अल् फतेह'चा कारभार चालतो. अम्मान हे त्यांचेही मुख्य केंद्र आहे. म्हणजे खुद्द अम्मानमध्येच राजे हुसेन यांना प्रचंड विरोधाला तोंड द्यावे लागत आहे.

गेली २० वर्षे ज्यांना आपल्या देशाला मुकावे लागले, निर्वासित व्हावे लागले त्या पॅलेस्टॅनियन निर्वासितांमधून (त्यांची आजची संख्या आहे १ कोटी ५० लक्षांवर) अल् फतेह व इतर संघटनांसाठी 'फेदयिन' भरती केले जातात. कोणत्याही सरकारचे त्याच्यावर वर्चस्व नसून ते त्यांच्या संघटनेला जबाबदार असतात. निरनिराळ्या निर्वासित छावण्यांमध्ये आज साधारणपणे १० लक्ष निर्वासितांची सोय करण्यात आली आहे. त्वेषाने धगधगणाऱ्या या छावण्या 'त्यांच्या पॅलेस्टाईनच्या मुक्तीसाठी' उदार हस्ते तरुण व तरुणी देत असतात. एका वृद्ध मातेचे हे उद्‌गार वाचा. 'माझा मुलगा एका हल्ल्यात मारला गेला, इथे तो छावणीत मारला गेला नाही! याबद्दल मला अभिमान वाटतो आहे. दुसऱ्या मुलाने त्याची जागा घ्यावी म्हणून मी त्याला पाठविला आहे आणि माझ्या आठ वर्षाच्या मुलाला मी याच कार्यासाठी तयार करीत आहे. एक दिवस असा उजाडेल की मी मोठ्या अभिमानाने त्यालाही याच कामगिरीवर पाठवीन' (आज या छावण्यांमध्ये आठ वर्षांच्या मुलापासून युद्धाचे प्रशिक्षण दिले जाते.)

भरतीचे दुसरे केंद्र असते अरब जगातील निरनिराळी विद्यापीठे.

अल् फतेहच्या एका सेनाधिकाऱ्याने ६७ च्या इस्रायलच्या विजयाबद्दल पुढील उद्‌गार काढले, 'इस्रायलच्या विजयाने आम्हाला 'अरब जग' एका सोन्याच्या तबकातून अर्पण केले.'

१९६७ नंतर विद्यार्थ्यांनी शाळा-कॉलेजे सोडली आणि दहशतवादी संघटनेत सामील होण्याकरिता रांगा लावल्या. कायरो, बैरूत येथील अनेक डॉक्टर्सनी प्रॅक्टीस सोडून जखमींच्या सेवेसाठी जॉर्डनमध्ये प्रस्थान ठोकले. अरब व्यापारी हत्यारांच्या खरेदीसाठी थैल्या मोकळ्या करू लागले. काही अरब सरकारांनी मदतीसाठी पैसा पुढे केला.

खरं म्हणजे बहुतेक सामान्य अरबी माणूस फेदयिनबद्दल आस्था बाळगणाराच असतो. अम्मान विमानतळावर अनेकवेळा मोठे मोठे पेटारे येतात. त्यावर 'पॅलेस्टाईन राष्ट्र, अम्मान' असे किंवा 'इस्त्रायल विरूद्ध लढणारे स्वातंत्र्ययोद्धे, अम्मान' असे शिक्के असतात, आणि काळ्या रंगाच्या सुटात असणारे काही तरुण जकात अधिकाऱ्यांच्या कानात कुजबुजतात, 'फेदयिनसाठी आहे हं हे!' यानंतर अर्थातच हे सर्व पेटारे कस्टम्सच्या तपासणीतून सहीसलामत बाहेर पडतात.

हे सर्व पेटारे फेदयिनच्या निरनिराळ्या ठिकाणी म्हणजे मृतसमुद्र ते अकाबाचे आखात, वाळवंटी प्रदेश, आणि वादी आराबाच्या पूर्वेकडे असलेल्या पर्वतराजीतील पन्नास तळांपैकी कोणत्यातरी तळाकडे जातात. सुमारे १० हजार हल्लेखोर अरब या कामात असल्याबद्दल बोलले जाते.

फेदयिनमधील कोणताही माणूस त्यांच्या संघटनेबद्दल काहीही सांगणार नाही. अराफतच्या अल् फतेहबद्दलचे निर्णय दमास्कसमधील काही श्रीमंत नागरिकांची समिती घेते असे म्हटले जाते. अराफतबद्दलही विशेष कोणाला काही माहिती नसली तरी तो कोण आहे हे प्रत्येकाला ज्ञात आहे. अबु अमर हे अराफतचे

---

## अरब गनिमांची निवड कशी होते ?

अरब जगातील विद्यापीठे आणि निर्वासितांच्या छावण्या यातून अनेक तरुण व तरुणी गनिमी सैनिक होण्यासाठी येतात. त्यांची संख्या प्रचंड असते. प्रामुख्याने पॅलेस्टाईनमधील तरुणांना अग्रक्रम दिला जातो. या सर्वांची अत्यंत कडक अशी वैद्यकीय तपासणी होते. त्यानंतर मानसशास्त्रज्ञांच्या देखरेखीखाली काही महत्त्वाच्या चाचण्या द्याव्या लागतात. सरतेशेवटी त्यांच्या सहनशक्तीची, मनोधैर्याची आणि किती प्रमाणात ते पाशवीकृत्ये सहन करू शकतील याची चाचणी घेण्यात येते.

पाप्रसंगी त्याला एक मोठा लाकडी खोका देण्यात येतो. खरे म्हणजे त्यात एक नुकताच मारलेला कुत्रा असतो व रक्त त्या खोक्यातून ठिपकत असते. पण त्याला असे सांगण्यात येते की त्या खोक्यात त्याचा एक जखमी सहकारी आहे. या सर्व प्रकाराने त्याला उलट्या झाल्या वा चक्कर आली तर गनिम म्हणून त्याची निवड व्हायला तो योग्य ठरत नाही. त्याला इतर थोडे हलके काम दिले जाते. जे तरुण या सर्व चाचण्या तरून जातात त्यांना सिरीया, लेबॅनॉन, जॉर्डन व इराक येथे प्रशिक्षणार्थ पाठविण्यात येते.

---

सांकेतिक नाव. अम्मान येथील प्रमुख केंद्रात तो एका लाकडी डेस्कवर काम करीत बसलेला असतो. एखाद्या मोहिमेतील फत्ते झाल्याची बातमी जेव्हा एखादा निरोप्या त्याला सांगतो त्यावेळी काळ्या चष्म्यामागे (रात्रंदिवस त्याच्या डोळ्यावर काळा चष्मा असतो) त्याचे डोळे आनंदाने नाचतात.

मंदपणे बोलणारा यासिर अराफत स्वत:बद्दल कधीच बोलत नाही.

'पर्सनॅलिटी कल्ट' त्याला आवडत नसल्याचे तो सांगतो. 'मी फक्त एक सैनिक आहे, आमचा नेता आहे पॅलेस्टाईन.' हे त्याचे उत्तर.

'मृत्युमार्ग हा आपला मार्ग आहे. स्वार्थत्यागाने मातृभूमी परत मिळविणे हे आपले ध्येय्य आहे. हे साध्य करण्यासाठी आपण अपुरे पडलो तर आपली मुले ते कार्य करतील, त्यांची शक्ती कमी पडली तर त्यांची मुले ते पुढे चालू ठेवतील' हा असतो त्याचा संदेश.

ज्यूंच्या पवित्र 'वेलिंग वॉल' या स्थानाजवळ, जेरूसलेम यथे त्याचा एका चांगल्या कुळात जन्म झाला.

स्थलांतर ही काय चीज असते ते त्याने लहान वयातच अनुभवले होते. पश्चिम आशियात असे सांगितले जाते की कायरोजवळ त्यांच्या पूर्वजांची जमीन होती पण प्रथम राजे फरूक व नंतर नासेरने त्याच्या वडिलांच्या, बळकावलेली जमीन परत देण्यात यावी या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. कदाचित त्याला नासेर-बद्दल फारसे प्रेम वाटत नसल्याचे हे एक कारण असावे असे म्हटले जाते.

१९४८ सालच्या इस्रायलबरोबरच्या युद्धात त्याने शाळकरी मुलगा म्हणून बंदूकही चालवलेली आहे. त्यानंतर कायरो विद्यापीठातून (पूर्वीचे फौद विद्यापीठ) त्याने सिव्हिल इंजिनियरींगचा अभ्यास केला. पुढे कुवेतमध्ये नोकरी करीत असतानाच त्याने जहाल राष्ट्रवादी विचारांचे एक नियतकालिक चालविले होते. १९५५ मध्ये कायरोच्या अधिकारी प्रशिक्षण शाळेत त्याने लष्करी डावपेचांचे धडे गिरविले आणि स्फोटक पदार्थांच्या तंत्रात चांगलेच प्राविण्य मिळविले. १९५६ सालच्या अरबांच्या अपयशाने त्याला ठामपणे वाटू लागले की पारंपारिक युद्धात अरब जग इस्रायलपुढे टिकाव धरू शकणार नाही. १९५० सालापासूनच त्याने अल्जिरियन पद्धतीच्या गनिमी युद्धाचे तंत्र आत्मसात करण्यासाठी संघटित प्रयत्न चालू केले होते व गाझा टापूतून इस्रायलला मधून मधून दणका देण्याचे कार्य चालूच ठेवले होते. ५६ च्या युद्धानंतर त्याने अल् फतेहची स्थापना केली पण ६४ सालपर्यंत पहिला हल्ला करण्यासाठी थांबावे लागले. कारण संघटनेची बांधणी चालू होती. हा काळ प्रयोगात्मक काळ होता आणि आठवड्याला फक्त एकच हल्ला आयोजित करण्यात येत असे. याच काळात लोकमताचाही अंदाज घेण्यात येत होता.

गनिमी काव्याचे महत्त्वाचे सूत्र असते मित्रत्वाचा हात देणाऱ्या लोकांत राहून हा लढा लढवणे. पण त्या काळात अल फतेहला लोकांचा पाठिंबा मिळणे कठीण

होते. मात्र ६७ सालच्या सहा दिवसांच्या युद्धामुळे लोकांच्या पाठिंब्याच्या लाटेवर आरूढ होण्याचे भाग्य अल् फतेहला लाभले. याच लढाईत अरब सैन्याने मागे टाकलेली शस्त्रे व दारूगोळा यांचा प्रचंड साठा इस्त्रायली सैन्याच्या हाती पडण्याआधीच अल फतेहच्या हाती पडला. इतरही मार्गांनी अल फतेह व तत्सम इतर संघटनांना मदत मिळते. पूर्वी आठवड्याला इस्त्रायलवर एकदा हल्ला करून. त्यांच्या गनिमी युद्धतंत्रांची चाचणी घेणारी, इस्त्रायलची संरक्षण व्यवस्था व अशा हल्ल्यानंतरची प्रतिक्रिया पहाणारी ही संघटना आज मात्र दिवसाला २५ ते ३० हल्ले करू शकेल एवढी क्षमता प्राप्त करू शकली आहे.

अशा प्रकारच्या सर्वच अरब संघटना त्या दहशतवादी असल्याचे नाकारतात तरी हे एक सत्य आहे की इस्रायलच्या नागरी वस्त्यांवर त्यांचे हल्ले होतात. निष्पाप बालकांना घेऊन जाणाऱ्या शाळेच्या बसवर बॉम्बस् टाकले जातात. चित्रपटगृहे वा शाळेचे पटांगण यावर ग्रेनेडस् टाकले जातात. अनेक वेळा पेरलेल्या सुरुंगांमुळे इस्रायली सैनिक नव्हे तर एकादा नागरिकच मरतो. 'एका वेळी एकच शत्रू' (इस्रायल) या धोरणाने अराफत व त्याची अल् फतेह संघटना राजकारणापासून अलिप्त आहे. त्यांचे ध्येय एकच–'पॅलेस्टाईनची मुक्ती, इस्रायलचा समूळ नाश.' अनेक वेळा निरनिराळ्या दहशतवादी संघटनेतील लोक दुसऱ्या बाजूकडील माणसे इस्रायली असल्याचे समजून स्वतःच्या बांधवांवरच हल्ला करतात. याचे कारण दोन्ही संघटनेचे लोक साधारणपणे रात्रीच्या वेळी गुप्तपणे व स्वतंत्रपणे हल्ल्यासाठी बाहेर पडतात त्यामुळे अशा चुका घडतात. पण असे होऊ नये म्हणून एक समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. इतर संघटनांची नावे अशी– पॉप्युलर फ्रंट फॉर लिबरेशन ऑफ पॅलेस्टाइन' या संघनेचे नेते आहेत डॉ. जॉर्ज हबाश – सध्या डॉ. हबाश उत्तर कोरियात आहेत. या संघटनेची

---

अम्मानबाहेरील बाक्का या निर्वासित छावणीतील ८ ते १२ वर्षापर्यंतच्या लहान मुलांना गनिमी तंत्राचे शिक्षण दिले जाते. रायफलस्, मशिन गन्स हे त्यांना हातातली पुस्तके, पेंसिल्स हाताळण्यासारखे असते.

मृत फेदयिनांच्या मुलींना 'हुतात्मा कुटुंब कल्याण सेवेत' दाखल करून घेण्यात येऊन त्यांनाही लष्करी शिक्षण दिले जाते. 'मी 'फतेह'ची कन्यका आहे. आम्ही सर्व गनिम आहोत' हे त्यांना पटविण्यात येऊन त्या प्रकारची मनोवृत्ती तयार करण्यात येते.

निर्वासित छावण्यातील बहुतेक सर्वच स्त्रियांना वेळप्रसंगी उपयोगी पडावे म्हणून प्रथमोपचाराचे शिक्षण दिले जाते.

अनेक वेळा इस्रायलमध्ये एखादा बॉम्बस्फोट होतो वा दहशतवादी प्रकार घडतो. या प्रकारामागे आपणच असल्याचा दावा अल् फतेह, पी. एफ्. एल्. पी. वा तत्सम इतर गनिमी संघटना करतात. प्रत्यक्ष अशा प्रकारामागे कोण असते हे जाणणे फार कठीण असते.

---

आद्याक्षरे आहेत P. F L P. पाश्चिमात्य याचा उच्चार 'Flop' असा करतात. मात्र त्यांना P. F. L. P. जेवढी 'Flop' वाटते तशी ती नाही. या संघटनेची विचारसरणी अर्थातच डावीकडे झुकणारी आहे. डॉ हबाश हे साम्यवादी उत्तर कोरियात असण्याचे हेही एक कारण आहे. अराफतचा अति साहसवादी डाव्यांना विरोध आहे. परवाच्या विमाने पळविण्याच्या प्रकाराचा म्हणूनच त्याने धिक्कार केला. 'पॅलेस्टाईन लिबरेशन फोर्स' व 'पॉप्युलर डेमॉक्रॅटिक फ्रंट' या आणखी दोन महत्त्वाच्या संघटना. 'पॉप्युलर डेमॉक्रॅटिक फ्रंट'चे नेते आहेत नायेफ हवातमेह.

संयुक्त अरब प्रजासत्ताक, सिरिया, इराक हे देश विशेषेकरून अल् फतेहला शस्त्रास्त्रे पुरवितात त्याचप्रमाणे ही राष्ट्रे त्यांना लष्करी प्रशिक्षणही देतात. सोव्हिएट युनियनची प्रत्यक्ष मदत मिळत नाही पण सोव्हिएट शस्त्रास्त्रे मिळवणारी काही अरब राष्ट्रे त्यांना ती देतात. माओचे गनिमी तंत्र त्यांना व्यावहारिक वाटत नाही. त्यांना अल्जिरिअन गनिमी तंत्रच योग्य वाटते. एफ्. फॅनॉन या आज हयात नसलेल्या निग्रो मानसशास्त्रज्ञांकडून त्यांनी क्रांतीचे तत्त्वज्ञान घेतले आहे. इस्रायलचा पराभव करणे सोपे काम नाही याची सर्वांनाच जाणीव आहे. म्हणूनच अराफतला असे वाटते की इस्रायल जितका अधिक अरबांचा प्रदेश पादाक्रांत करील तितके बरे, कारण त्यामुळे इस्रायली सीमेलगतच्या सर्व देशांतून मुक्ति–संग्राम सुरू होईल.

इस्रायली लोकांनी आतापर्यंत अनेक गनिमांना पकडले अथवा ठार केले असल्याने ते म्हणतात की हे गनीम खऱ्या अर्थाने व्हिएट कॉंगच्या तोडीचे नाहीत. मात्र अराफतबद्दल त्यांना आदर आहे. इस्रायलच्या गुप्त हेर खात्याने तीन चार वेळ अराफत इस्रायली हद्दीत येऊन गेल्याचा रिपोर्ट दिला होता. इस्रायलच्या सुरक्षा फळीतून निसटून जाणे हे येरागबाळ्याचे काम नाही. याला आळा म्हणून इस्रायलने विद्युत प्रवाह वाहणारी तारांची कुंपणे सीमाप्रदेशात घातली आहेत. अरब गनिमांना निपटून काढण्याचे जे प्रयत्न इस्रायलकडून केले जातात त्याचा परिणाम नेमका उलट होतो. भले इस्रायलला यश मिळते; पण अधिकाधिक अरब इस्रायलविरोधी बनून जहाल मार्गाकडे वळतात असा अनुभव येत चालला आहे. इस्रायली नागरिकांना प्रथमोपचार, सुरुंग ओळखणे, बॉम्बविरुद्ध खबरदारी घेणे आदी गोष्टींचे प्रशिक्षण दिले जाते.

अल् फतेह आणि इतर संघटना इस्रायलपेक्षा राजे हुसेन यांनाच अधिक धोकादायक आहेत. आज या संघटनांमागे अरब जनतेची प्रचंड शक्ती एकवटलेली आहे. म्हणूनच त्यांच्याविरुद्ध बोलणे किंवा इस्रायल स्वीकारू शकेल अशी योजना मान्य करण्याचे धाडस कोणताही अरब नेता करू शकत नाही. अराफत व त्याच्या इतर सहकाऱ्यांना हे मंजूर होणे शक्यच नाही.

फेदयिनची शक्ती वाढणे याचाच अर्थ मध्यपूर्वेतील शांतता प्रयत्नांना खीळ बसणे असाच आहे. आजही इस्रायलने हे सर्व अत्याचारी प्रकार थांबेपर्यंत अमेरिकेने सुचविलेल्या शांतता योजनेनुसार वाटाघाटी करण्याचे नाकारले आहे. ¤ ¤ ¤

# कात्रणे । कातरणे

## वासराने स्टूल का ढकलले ?

अकोला :– येथील नेताजी सुभाष रोडवरील सार्वजनिक गणेशमूर्ती फुटल्यामुळे खळबळ उडाली. डी. एस्. पी. जोशी म्हणाले की, मूर्ती स्टुलावरून खाली पडलेली आढळली, तेव्हा फुटलेल्या मूर्तीजवळ वासराच्या पावलाच्या खुणा आढळल्या. मूर्तीजवळ स्वयंसेवक नाही, असे पाहून वासरू तेथे आले असावे व त्याने मूर्ती ढकलल्यामुळे पडून फुटली असावी.

वासराने स्टूल ढकलले याबद्दल आम्हाला मुळीच शंका नाही. सर्वसाधारणपणे गोमाता आपली वासरे घेऊन रस्त्याच्या मध्यभागी बसतात. त्यांची ती पद्धत आहे ! मध्येच मोटार वगैरे आली तर वासरू आनंदाने टुणकन् उडी मारते व एकदोन सायकलस्वारांना खाली उतरवून पुन: आईपाशी येऊन बसते. गोमाता आपल्या लाडक्यांचा हा अवखळपणा पाहून त्यांना आवेगाने मग चाटू लागते. नेहमी दिसणारे हे दृश्य आहे. सार्वजनिक गणपती हे रस्त्यावर दहा दिवस मुक्काम टाकतात व त्यांना पहाण्यासाठी उरलेला 'सेक्युलर' रस्ता निधर्मी माणसे बंद करतात. या दहा दिवसात असंख्य गोमातांनी व त्यांच्या लेकरांनी मग बसायचे तरी कुठे ? या अकोल्याच्या वासराला तरी त्याच्या आईने सांगितले होते –'बाळा, हा धार्मिक त्रास फक्त दहा दिवसांचा आहे ! आपण हे दहा दिवस काढू कसे बसे. मग रस्ता आपलाच आहे.' परंतु तरुण रक्ताला हा उपदेश कसा बरे रुचावा ? वासराने स्टूल ढकलून मूर्ती फोडून टाकली ! नक्षलवादी कुठला ! वासराला वाटले अशाने रस्ता मोकळा होईल. पोरच ते. काय कळतंय त्याला. कार्यकारी मंडळाने लगेच दुसरी प्रचंड मूर्ती आणली असावी. वासरानेच काय पण हिंदकेसरी पहिलवानाने ढकलली तरी पडणार नाही एवढी प्रचंड !! हत्तीही चढू शकणार नाही एवढे प्रचंड 'स्टेज' तयार करून हा प्रचंड सार्वजनिक गणपती रस्त्यावर तरीही दहा दिवस त्यांनी बसवला असलाच पाहिजे. पुढील वर्षी निदान गणपतीचे दहा दिवस,

रस्त्यावरील सर्व गोमाता व वासरे पोलिसांनी पकडून ठेवावी अशी आमची सूचना आहे. निदान अकोल्याच्या डी. एस्. पी. नी तरी हे करायलाच हवे.

## धंदे-शिक्षण

मुंबई :— विद्यापीठ सेवासंघाने आयोजित केलेल्या एका परिसंवादात बोलताना सी. डी. देशमुख म्हणाले की, शिक्षणाची धंद्याशी सांगड घातल्याखेरीज बेकारीचा प्रश्न सुटणार नाही. विद्यार्थ्यांना पार्ट-टाईम नोकऱ्या अथवा काम मिळण्याची सोय व्हायला हवी.

श्री. देशमुख यांनी सुचवलेला बेकारीवरील उपाय अत्यंत महत्त्वाचा आहे. परंतु याबाबतीत अजून काहीच झालेले नाही असे आम्हाला म्हणता येत नाही. विद्यार्थ्यांना शाळेत शिकत असतानाच, आपल्याला पुढील आयुष्यात काय 'उद्योग' करायचा आहे हे ठरवता आले पाहिजे. यादृष्टीने कुठला धंदा सध्या तेजीत चालतो, कुठल्या व्यवसायात 'पार्ट-टाईम' 'नोकऱ्या' वा 'काम' शक्य आहे हे सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवले पाहिजे. जो शिक्षक केवळ आपल्या वागणुकीने विद्यार्थ्यांना बरेच शिकवतो तो खरा आदर्श शिक्षक होय. या दृष्टीने पंचायत राज्य शिक्षणाचे अवलोकन करून डॉ. मंगूडकर यांनी जो अहवाल तयार केला आहे तिकडे आम्हा श्री. सी. डो. देशमुखांचे लक्ष वेधू इच्छितो. डॉ मंगूडकर म्हणतात— 'जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षक दारू पिऊन शाळेत येतात. हे प्रमाण २ ते १० टक्के आहे. ठाणे-कुलाबा या जिल्ह्यात ते २५% आहे.'

धंदे-शिक्षण देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण इतके अल्प आहे हीच काय ती दुःखाची


### पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो. कतरीसराय (गया)

गोष्ट आहे. परंतु हळूहळू हे प्रमाण वाढेल व विद्यार्थ्यांना आपण पुढे काय धंदा करायचा व त्यादृष्टीने शिकत असताना काय हालचाल करायची हे समजून येईल याबद्दल आमची खात्री आहे.

## बानर्जींना एक अर्जी !

कन्याकुमारी येथे विवेकानंदांचे एक मोठे स्मारक निर्माण झाले. एक कोटी रुपये खर्चून भारताच्या दक्षिण टोकाला निर्माण झालेले हे स्मारक काही मंडळींना आवडलेले नाही. वस्तुतः या स्मारकाच्या दोन्ही अंगाला 'स्टार ऑफ इंडिया' सारखी ख्रिश्चन धर्माची प्रचंड प्रार्थनामंदिरे उभी असताना, तिथे हे स्मारक कशाला ? या स्मारकाची अवहेलना करणारी पत्रे, जागरूक वाचकांनी मुंबईच्या 'इंग्रजी टाईम्स' व 'इंडियन एक्प्रेस' या वृत्तपत्रांतून लिहिली आहेत. हे एक ए. के. बानर्जी यांचे पत्र पहा—

'अशा तऱ्हेची प्रचंड खर्चाची व अर्थशून्य स्मारके उभी करताना आपण असा विचार तरी करतो का की ज्या भारताच्या राष्ट्रीय पुरुषांचे स्मारक आपण करतो त्यांच्या शिकवणुकीला धरून हे आहे काय ?' श्री. रामस्वामी हे आपल्या पत्रात सुचवतात त्याप्रमाणे ही एक कोटीची रक्कम दरिद्री नारायणांवर खर्च केली असती, तर तेच विवेकानंदांना अधिक आवडले असते.

हे सगळे बानर्जी व रामस्वामी म्हणतात ते आम्हाला मंजूर आहे. Visit India to see Taj mahal अशी भारत सरकार परदेशात जाहिरात करते. हा ताजमहाल तर एका मुसलमान शहेनशहाने गरीब रयतेला पिळून त्यातून निर्माण झालेल्या पैशातून उभा केला आहे. विवेकानंदांच्या स्मारकाचे पैसे हे श्री. एकनाथजी रानडे व त्यांच्याबरोबरच्या हजारो स्वयंसेवकांनी जनतेतून गोळा केले असले, तरीही हा पैसा गरीब जनतेवर खर्च करायला हवा होता — हा आक्षेप मान्य करायला आमची हरकत नाही. परंतु सुरुवात ताजमहालपासून करू या ! आमची खात्री आहे की ताजमहाल विकायला काढला व जागतिक टेंडरे मागवली तर इग्लंड, अमेरिका, फ्रान्स, जपान या देशातून कोट्यावधी रुपयांच्या रकमा देऊ केल्या जातील. हे देश आपल्या खर्चाने व आपले गवंडी लावून हा ताजमहाल उचलून नेतील ! आपण यापुढे आपल्या वास्तू विकू या. बाकी सगळे विकून झालेच आहे ! करायची का बानर्जी महाराज गरीब जनतेची अशी सेवा ? व्हॅटिकनच्या पोपला आणि इंदिरा गांधी — महंमद कोया कंपनीला विचारून काय ते कळवा...!

— सेनामहाराज

# पुन्हा एकदा मध्यपूर्व

जॉर्डन आज पेटून उठला आहे. मध्यपूर्वेच्या भडकत्या भूमीवरलं हे छोटंसं राष्ट्र ! अरब – इस्रायल संघर्षापासून जवळजवळ सतत संघर्षाच्या परिणामांना बळी पडलेलं ! पॅलेस्टाईन मुक्ति – संग्रामवादी दहशतवाद्यांचे बालेकिल्ले आणि इस्रायल ह्यांच्या कात्रीत हे छोटंसं अरब राज्य सापडलेलं आहे. अरब जगतात हे दहशतवादी तसे सर्वत्र पसरले आहेत; आणि विविध अरब सरकारांची त्यांना सहानुभूतीही आहे. तरीदेखील जॉर्डन आणि लेबॅनॉन हेच ह्या दहशतवाद्यांचे खरेखुरे गनिमी अड्डे. ह्या दोन्ही राष्ट्रांतनं त्यांनी आपापली प्रतिसरकारे स्थापन केली आहेत. तिथे त्यांचा स्वतंत्र रेडिओ आहे, त्यांची वृत्तपत्रे आहेत, त्यांचे विमानतळ आहेत. ह्याच केंद्रांवरून त्यांचा इस्रायलविरोधी (व प्रतिगामीशक्तींविरुद्धही) धूमधडाक्याने प्रचार चालू असतो. खाकी गणवेषातली त्यांची पथकं ह्याच केंद्रांवरून इस्रायलवर गनिमी हल्ले चढवतात. इस्रायल अर्थातच ह्या पॅलेस्टॅनियन गनिमांवर निकराचे प्रतिहल्ले चढवतो. त्या हल्ल्याच्या तीव्रतेमुळे आणि इस्रायलमध्ये घुसून उलथा-पालथ करणाऱ्या दहशतवाद्यांना आलेल्या अपयशामुळे दहशतवाद्यांची चांगलीच पीछे-हाट झाली होती. इस्रायलव्याप्त टापूतून, सीमा भागातून त्यांचं जवळजवळ उच्चाटण करण्यात इस्रायलला यश मिळाले आहे. ह्या साऱ्यांतनं एक प्रकाराचं नैराश्य गनिमां-मध्ये पसरत असतानाच, अमेरिकेनं आपली शांति–योजना पुढे मांडली. तिच्या अनुषंगानं इस्रायल–इजिप्त–जॉर्डन ह्या राष्ट्रांनी युद्धबंदी स्वीकारली. या युद्ध-बंदीनं भडकलेल्या गनिमांना नवीन इंधन पुरवलं. त्यांतल्या एका गटानं (Popular front for the Liberation of Palestine) हवाई–चांचेगिरीचा मार्ग पत्करला. तर पॅलेस्टाइन मुक्ति संघटनेनं (फताह संघटना) युद्धबंदी स्वीकारणाऱ्या राजे हुसेन ह्यांच्याकडे मोर्चा वळवला. ह्याचं कारण अर्थातच उघड होतं. नासेरविरुद्ध दंड थोपटणं त्यांना शक्य नव्हतं. अम्मनमध्ये त्यांचे जबरदस्त अड्डे होते; आणि जॉर्डनचं नेतृत्व राजे हुसेनकडे म्हणजेच प्रतिगाम्यांच्या हातात होतं. म्हणूनच खुद्द अम्मनमध्ये, हवाई–चांचेगिरीत मिळविलेल्या विमानांना, त्यातील उतारूना अडक-वून ठेवलं. विमानं उडवून लावली. राजे हुसेन ह्यांच्या सत्तेला हे जबरदस्त आव्हान होतं. गनिमांविषयीची थोडीशी सहानुभूती व दुसरीकडे स्वतःच्या सत्तेला मिळालेलं आव्हान अशी परिस्थिती निर्माण झाल्यावर त्यांनी गनिमांविरुद्ध शस्त्र उपसलं.

जॉर्डनमध्ये सध्या चालू असलेल्या धुमश्चक्रीचं मूळ असं काहीसं गनिमांच्या नैराश्यात व काहीसं त्यांनी राजे हुसेन ह्यांच्या सत्तेला दिलेल्या आव्हानात आहे.

पॅलेस्टॅनियन दहशतवादी व जॉर्डनी फौजा ह्यांच्या पुरतीच ही धुमश्चक्री मर्यादित राहिली तर, जॉर्डनी फौजा गनिमांना निपटून काढू शकतील असं मानायला हरकत नाही. १९६७ पासून गनिमांच्या संख्येत वाढ झाली आहे. त्यांना सहानुभूतीही चांगली मिळत आहे. अरब राष्ट्रं अर्थसहाय्यही त्यांना भरपूर करीत आहेत. तरी-देखील, इस्त्रायलमधली गनिमांची कामगिरी लक्षात घेता, त्यांची तयारी चांगली नसावी असंच अनुमान काढावं लागेल. आणि म्हणूनच मी वर म्हटलं की जॉर्डनी फौजा ह्या यादवीत वर्चस्व गाजवतील.

परंतु हे युद्ध जॉर्डनी फौजा व गनिम ह्यांच्यापुरतं मर्यादित राहीलसं दिसत नाही. लिबिया, इराक, सिरिया ह्यांनी ह्यापूर्वीच गनिमांच्या बाजूनं, वेळ पडल्यास, युद्धात उतरूं असं सूचित केलं आहे. इस्त्रायलनंही वेळ पडल्यास व सिरिया—इराक जॉर्डनमध्ये घुसल्यास स्वसंरक्षणार्थ ह्या युद्धात आपण ओढले जाऊ असं म्हटलं आहे. अमेरिकेनंही आपल्या नौदलास सज्ज राहण्याचा आदेश दिला आहे. राजे हुसेन ह्यांचं आसन डळमळीत होतंयसं दिसताच, अमेरिका त्यांच्या मदतीस धावून गेल्या-शिवाय राहणार नाही. थोडक्यात ह्या ज्वाळा मर्यादित न राहता भडकल्या गेल्या तर, त्यातून वणवा सहज होऊ शकेल. असा वणवा आज कुणालाच मानवणारा नाही.

ह्या सर्व प्रकारात इजिप्तची परिस्थिती मोठी केविलवाणी झाली आहे. हुसेनी अंमल जॉर्डनमधून लयाला जाऊन तिथे गनिमी दहशतवाद्यांची राजवट येणं नासेरना मानवणारं नाही. कारण ही राजवट म्हणजे मध्यपूर्वेत चीनला आमंत्रण. अर्थात नासेरना हे रुचणार नाही. परंतु त्याचवेळी गनिमांचा धिक्कार करून राजे हुसेन ह्यांच्या पाठीशी उभं राहणंही ते पत्करणार नाहीत. न जाणो, त्यामुळे उद्या प्रति-गामित्वाचा शिक्का बसून त्यांच्यावरच अरब जनमत उलटलं तर? ह्या परि-स्थितीत राजे हुसेन व पॅलेस्टॅनियन मुक्ति—आघाडी ह्यांच्यात समझौता घडवून आणायचा प्रयत्न करणं एवढंच त्यांच्या हातात उरतं. प्रे. नासेर ह्यांचे त्याच दिशेने प्रयत्न चालू आहेत. आणि तशी शांतता प्रस्थापित केली गेली तरच, मध्यपूर्वेतली आग शमेल आणि गुन्नार यारिंग ह्यांच्या शांतता—प्रयत्नांना अर्थ उरेल!

## लुसाका परिषद आणि चीन

जागतिक राजकारणाचे रंग रोजच्या रोज अगदी झपाट्याने बदलत आहेत. काल कालपर्यंत ज्या दोन राष्ट्रांमधनं विस्तवदेखील जात नसे, त्यांच्यात आज मित्रत्वाचे, अनाक्रमणाचे करार घडून येत आहेत. ताजं उदाहरण म्हणजे रशिया-प. जर्मनी करार! ह्याचवेळी रशियाला, सकारण आज असं वाटू लागलेलं दिसतंय् की, अमेरिका, जपान, चीन (कम्युनिस्ट) अशी एखादी आघाडी आज

उद्या कदाचित रशियाविरुद्ध उभीही ठाकेल. रूसो-पाक मैत्री वाढू पाहात आहे तर कम्युनिस्ट चीन रोज नवनव्या भांडवलशाही राष्ट्रांशी व्यापारी करार करीत आहे. पॅरीस-पेकींग तर बरेच जवळ येऊ पाहात आहेत. जागतिक चित्र हे असं झपाट्यानं बदलू पाहात आहे. प्रत्येक राष्ट्र, विशेषतः बडी राष्ट्रं अत्यंत काळजीपूर्वक पावलं टाकून नवनवीन संबंध प्रस्थापित करू पाहत आहेत. झांबियाची राजधानी लुसाका येथे भरलेल्या अलिप्त राष्ट्रांच्या परिषदेने संमत केलेल्या ठरावांचे लाल चीनने केलेले स्वागतही अशाच प्रकारचे मानले गेले पाहिजे.

वास्तविक, अलिप्त गटाच्या तीन म्होरक्यांपैकी कुणाशीही लाल चीनचे संबंध जिव्हाळ्याचे नाहीत. भारत आणि युगोस्लाव्हियाशी तर त्याचं जवळ जवळ वैरच आहे. इजिप्तबद्दलचं त्याचं धोरण साशंक आहे. त्यातच इजिप्त पूर्णपणे रशियाकडे झुकलेला आहे हेही चीनला सलत असणारच ! आणि असं असूनही, एरवी अलिप्त राष्ट्रांवर खडसून उठणाऱ्या चीननं, लुसाका-ठरावाचं स्वागत केलं आहे. त्यात सहभागी झालेल्या कुठल्याही (अगदी भारतासुद्धा !) राष्ट्रावर चीननं टीकास्त्र सोडलेलं नाही. हा बदल सूचक आहे, बदलत्या राजकीय चित्राच्या जाणीवेचा द्योतक आहे.

१९६५ मध्ये चीननं पाकिस्तान, इंडोनेशिया, अल्जिरिया आदींच्या साहाय्यानं, अलिप्त गटाला आव्हान द्यायचा प्रयत्न केला. ब्यूनोस आयरिस ह्या ठिकाणी दुसऱ्या बांडुंग परिषदेचा घाट चीननं घातला. परंतु रशियाला प्रतिनिधित्व देण्याच्या प्रश्नाचा अडसर आला. त्याचवेळी अल्जिरियातही बंडाळी माजली नि चीनचा साराच डाव उधळला गेला. त्यानंतर चीन अंतर्गत घडामोडीत इतका गुरफटला गेला की, चीनबाहेर त्याचं जवळजवळ दुर्लक्षच झालं. मध्यंतरी डॉ. एन्क्रुमा आणि डॉ. सुकार्नो दोघेही राजकीय पटावरून दूर केले गेले नि चीनचे दोन महत्त्वाचे साथीदार कमी झाले. मध्यपूर्वेत व आफ्रिकेतही रशियानं बस्तान बसवलं. अगदी अलीकडे रशियानं सूचित केलेल्या आशियाई राष्ट्रांच्या सामूहिक संरक्षण योजनेचा रोखही चीनविरोधीच होता. आणि विशेष म्हणजे ही योजना कदाचित मूळ धरू लागेल इतपत परिस्थिती तयार झाली आहे. ह्या साऱ्याच घडामोडींमुळे चीन अलीकडे एकाकी पडल्यासारखा भासत आहे. प्रत्यक्ष चीनलाही ह्याची जाणीव असावी. शिवाय रशियाचे आफ्रो-आशियाई विभागात पसरत असलेले हातपायही त्याला दिसत असावेत. रशिया करीत असलेल्या नवनवीन करारांचा व अमेरिकेशी प्रत्यक्ष संघर्ष टाळायचा प्रयत्न ह्यातूनही अर्थातच चीननं आवश्यक तो अर्थ काढला असणारच. आणि म्हणूनच चीननं विविध राष्ट्रांशी संबंध सुधारण्याचा झटून प्रयत्न चालवला असल्याचं दिसतं. अलीकडे पेकींग नभोवाणीवरून भारतविरोधी तोफा डागल्याचं ऐकू येत नाही त्यामागेही हेच रहस्य असावं !

—सु. ल. सोमण



# नऊ तास सतत कोणीही नृत्य करून दाखवावं, माझे पाय कापून टाकीन....

## —गोपीकृष्ण

अशोक चौधरी

गोपीकृष्ण हा मूर्तीमंत नाचणारा आहे. साधं सरळ चालणं याला ठाऊक नाही. किंबहुना हा चालतच नाही म्हणा ना! हा नेहमी नाचतोच, पायाला सदाची भिंगरी लागलेली. एखादा क्षण हा स्थिर राहिला तर शपथ. तुमच्याशी गप्पा मारता, मारता याला काही-तरी आठवेल, मग हा घरात कोठेतरी गायब होईल. तो येईपर्यंत त्या दालनाचा भूगोल आपण न्याहाळायचा, भिंतीवर असला तर त्याचा फोटो आपण बघत बसा-यचं, चांगला पाच-दहा मिनिटानं हा उगवणार. त्याच्या एका हातात व्हिस्कीची छानदार बाटली आणि दुसऱ्या हातात ग्लासेस. मग हा मिठ्ठासपणं म्हणणार, 'आप पियेंगे?' तुम्ही नकार दिला की आफतच! कारण हा पुन्हा पाच—दहा मिनिटं नाहीसा होणार, तो येईपर्यंत त्या दालनाचा पूर्ण भूगोल दोन—चार वेळा न्याहाळून होतो. परतल्यावर हा त्याच मिठ्ठासपणं म्हणणार,

'आपके वास्ते शर्बत तो लाने गया था' तुमचं काही चालत नाही. गप्पा सुरू होतात. तुमच्या शर्बती शब्दांना तो व्हिस्कीत बुडवून टाकतो. तुम्हाला गार करून टाकतो. आवेशाने बोलत राहतो. त्याचे हातवारे करणे आपल्यासारखे ऑर्डिनरी गचाळ नसते. त्यातही कलात्मकता असते. हा भुवया उचावतो, कपाळावर आठ्या पाडतो तेव्हा त्यातला नर्तक लपून राहत नाही.

गोपीकृष्णची मातृभाषा भोजपुरी. मुलाखत चालू असताना एखादा तपशील त्याला बरोबर आठवत नसेल तर त्याची शहानिशा करून घेण्यासाठी हा मोठ्यानं हाक मारणार, 'ओ तारादीदी!' तारादीदी ही त्याची आई. हा नुसती हाक मारून थांबणार नाही. खास भोजपुरी ठसक्यात तसाच हाक मारीत हा बाहेर पडणार. (मग पुन्हा आपलं दालन न्याहाळणं सुरू) आपल्या 'नटेश्वर भवन' या बंगलीत तारादीदी असतील तेथन त्यांना हुडकून काढणार, हवा तो तपशील विचारणार, 'ओ...तू क्या कहत है...' असं म्हणत नीट शहानिशा करून घेणार. पाच–दहा मिनिटानं परतणार आणि 'मैंने जो कहा था वही ठीक था.' असं म्हणणार! थोडंसं बोलणं झालं की पुन्हा ओरडणार 'ओ ऽ सावी – सावी म्हणजे सावित्री. बायको. सावीनं ओ दिली की हा म्हणणार 'जरा और शर्बत तो ला –' पुन्हा गप्पा सुरू.

असा हा गोपीकृष्ण. रक्तातच नृत्य भिनलेले. नृत्य हाच माझा देव, तीच माझी बायको, तीच माझी प्रेयसी, तोच माझा जिवश्च कंठश्च दोस्त, तेच माझं जीवन असं म्हणणारा. मी त्याला भेटलो तेव्हा त्याचा डावा पाय दुखावलेला होता. जिन्यावरून चढताना पाय घसरून इजा झाली होती. पायाला पट्टी होती. त्यामुळे पंधरा दिवस नृत्याची प्रॅक्टीस काही त्याने केली नव्हती. एक दिवस नाचलो नाही तर माझं वजन वाढतं असं त्याचं म्हणणं.

निळ्या चौकडोची लुंगी आणि वर कुडता असा त्याचा वेश. मानेपर्यंत रुळणारे केस. 'मायथॉलॉजिकल भूमिकेसाठी लागतात म्हणून ठेवलेत एवढे केस' असं तो म्हणतो. जरा एक मिनट ठहरिए...' असं सांगून प्रार्थनेसाठी जातो आणि मग परतल्यावर मुलाखतीला आरंभ करतो–

मी – आपलं पूर्ण नाव.

गोपी. – गोपीकृष्ण सोन्थालिया.

मी. – जन्म तारीख.

गोपी. – २२ ऑगस्ट १९३५. वय ३६.

अशा थाटात मुलाखत सुरू होते. व्हिस्कीचे घुटके घेत तो (आणि शर्बताचे घुटके घेत मी –) बोलत राहतो. तो मूळचा नाराजशीचा, त्याचे आजोबा (आईचे वडिल) सुखदेव म्हणजे बडं प्रस्थ. नाच गाण्यातला तो दर्दी असामी. पोरांना नाच शिकवण्याचा त्याचा छंद. उत्तर प्रदेशी मारवाडी कुटुंब. त्या काळात नाच वगैरे

पोरांनी करणं हीनपणाचं मानलं जाई. 'रंडी – भडुवा लोक है' असं म्हणून सोन्थालिया कुटुंबाला जमातीच्या लोकांनी त्यामुळं वाळीत टाकलं होतं. गोपी झाला तेव्हापासूनच आजोळी राहिला. त्याची मावशी म्हणजे प्रसिद्ध नर्तिका सितारादेवी. थोरली मावशी अलकनंदा. ती पण नृत्यनिपुण. गोपीची आई त्रिवेणी-देवी (तारादीदी) गाणारी आणि नाचणारीही. वाराणशीत उषा मुव्हिटोनच्या निरंजन शर्मांनी सिताराला पाह्यलं आणि चित्रपटात काम करायची ऑफर दिली. सारेजण मुंबईला आले. गोपी तेव्हा होता दहा महिन्यांचा, तारादीदीला 'शाही लकडहारा' या चित्रपटात नायिकेची भूमिका मिळाली. गोपीचे वडिल राधाकिसन सोन्थालिया रागावले. ते राहिले होते कलकत्त्यालाच. आपली बायको – तारादीदीला – त्यांनी पत्र लिहिलं. 'यापुढे चित्रपटात काम केलंस तर तुझं माझं नातं संपलं.' तारादीदीवर नवऱ्याचा वचक होताच. गोपीला मावशीकडे सोडून ती निघून गेल'.

'घन्नोकडे खूप लोक यायचे –' मी विचारतो. घन्नो कोण? 'घन्नो म्हणजे सितारादेवी,' असे सांगून गोपी सितारादेवीबद्दल बोलू लागतो. 'नृत्यकार, नृत्यतज्ज्ञ यायचे त्याचं वर्णन तो करतो. एखाद्याचा पदन्यास, एखाद्याची भावमुद्रा कशी मनात ठसून राह्यची तो सांगतो.

मी खूप लकी आहे असं त्याचं म्हणणं. तो वर्षाचा व्हायच्या आतच त्याला चित्रपटात काम करायची – (नव्हे, नुसतं दर्शन द्यायची –) संधी मिळालेली होती. मेहबूब यांच्या 'शहरका जादू' या चित्रपटात छोट्या सवितादेवीचे काम या गोंडस छोकऱ्याने केले होते. बम्बईका मवाली आदि चित्रपटातून हा 'अति बालकलाकार' चमकला होता. याचा मोबदला म्हणजे मुबलक चॉकलेटस् आणि खेळणी.

रंगमंचावर या पठ्ठ्यानं नृत्य केलं वयाच्या तिसऱ्या वर्षी. ज्या वयात 'आमचा छकुला उभा राह्यला आमी नाय पायला' अशा शब्दात पोरट्यांचं कौतुक होतं त्या वयात हा छबकडा गोपी बच्चू मास्टरच्या पथकात रंगमंचावर उभा राह्यचा. अलकनंदा मावशीनं बच्चूमास्टरशी लग्न केलं होतं. त्यांनी एक नृत्यपथक तयार केलं. या पथकात गोपीचा समावेश होता. 'तीन बरसके बच्चेका डान्स देखिए' अशीच या पथकाची जाहिरात केली जायची. गोपी नक्कल करण्यात वस्ताद. एखाद्याचं नृत्य पाहिलं की अगदी त्याबरहुकूम हा तस्संच करून दाखवायचा. 'एवढसं पोरटं नाचतंय छान' असं त्याचं कौतुक व्हायचं. तेव्हाचे रसिक म्हणजे इन्स्टन्ट कौतुक करणारे. लागलीच पैसे फेकायचे. वीस–वीस रुपये जमायचे. त्यातून साऱ्या नृत्यपथकाच्या जेवणाचा खर्च निघायचा.

पोरगा 'नमकतेज' आहे असे सारेजण म्हणायचे. शाळेत दाखल करायचं तर वय आडवं आलं. आपण सारेजण करतो तीच ट्रिक गोपीच्या घरवाल्यांनी केली.

त्याच्या जन्माचे साल १९३५ ऐवजी १९३३ दाखवलं आणि वडाळा येथील सेंट झेवियर या कॉन्व्हेन्ट स्कूलमध्ये त्याला दाखल केलं. शम्मीकपूर त्या शाळेत होता. तो ५ वी ६ वीत असेल. गोपीला शाळेत एक वर्ष झाल्यावर शम्मीचा भाऊ शशी आणि त्याची बहिण उमाही दाखल झाली. कुंदनानल सैगल यांची मुलेही होती. मजाच मजा. आपल्या वर्गात बहुतेक कोणी बंड्या नाहीतर रमेश असणार. पुढे तो स्टेट बँकेत, तुम्ही पोर्ट ट्रस्टमध्ये बस्स. एवढ्यात करिअर खतम. त्यामुळे आपल्याला गोपीकृष्णचा हेवा वाटला

शाळेत हा मॉनिटर वगैरे असायचा. असणारच, सारेच हिरो असतात. हा वर्गात पहिला बिहिला यायचा. हा सिनियर केंब्रिज झाला. हाडाचा नर्तक-त्यामुळे उड्या मारतच शिक्षण घेतलं. म्हणजे तिसरीतून एकदम पाचवीत अशा स्टाईलने. शाळेत हिंदी, मराठी बोलायची बात नव्हती. चार आणे दंड व्हायचा. त्यामुळे गोपीला हिंदीचा गंध नाही. आजोबांना हे समजलं तेव्हा ते रागावले. आपल्याबरोबर त्याला वाराणशीला घेऊन गेले. शिक्षणाला तेथेच विराम मिळाला. उत्तरप्रदेशातल्या खेडो-पाड्यांतून नृत्यपथकांबरोबर गोपी जाऊ लागला. आपल्या नृत्यानं लोकांचं मन बहलवू लागला. 'उत्तर प्रदेशका कोई ऐसा देहात नही की जहाँ मैं नाचने नही गया' असं गोपी म्हणतो.

आजोबा सुखदेव हुशार. पोरगं नाचणारं. त्याच्या पायात घुंगराबरोबर लग्नाची बेडी बांधून टाकली. दुल्हा १३ वर्षाचा, दुल्हन त्याहून लहान. चार-पाच वर्षानंतर हा पुन्हा आला मुंबईला. कथ्थक नृत्य एकदम टॉप करतो असा त्याचा सर्वत्र गवगवा झालेला. 'फूटवर्क छान, काय डायनॅमिक नाचतो' असं जाणकार म्हणायचे. त्याला नटराज पदवी देऊन झाली. नृत्यविशारद हा किताबही मिळाला. चित्रपटाच्या नृत्य-दिग्दर्शन करायच्या ऑफर्स येऊ लागल्या. 'भिन्न देशरमे'चं त्यानं नृत्य-दिग्दर्शन केलं. पूजा, कलियुग, नरसीभगत अशा विविध चित्रपटांचंही नृत्य-दिग्दर्शन केलं. काही चित्रपटातून सोलो नृत्यही केलं.

एच. एस. रवेल 'साकी' नावाचा चित्रपट काढीत होते. नायक होता प्रेमनाथ, नायिका मधुबाला, सी. रामचंद्र यांचं संगीत होतं. सध्या लोकप्रिय असलेला नट राजेंद्रकुमार तेव्हा थर्ड असिस्टंट डायरेक्टर होता. 'ब्रह्मचारी'चे दिग्दर्शक भप्पी सोनी तेव्हा प्रॉडक्शन मॅनेजर होते. कृष्णकुमार नावाचे गाजलेले नृत्यदिग्दर्शक होते. परंतु त्यांचे निधन झाल्याने नव्या नृत्यदिग्दर्शकाच्या शोधात एच. एस. रवेल होते. गोपीचं नाव सुचवलं गेलं. गोपी त्यांना भेटायला गेला तेव्हा रवेल कुठंतरी बाहेर गेले होते. राजेंद्रकुमार, भप्पी सोनी ही मंडळी टिवल्या बावल्या करीत बसली होती. गोपीला काय काम आहे असं विचारलं. हा १७-१८ वर्षाचा कोवळा तरुण काय बोडक्याचं नृत्यदिग्दर्शन करणार असाच भाव सार्‍यांच्या चेहर्‍यावर होता. राजेंद्र-कुमार गोपीला म्हणाला, 'ये, तुम अपना डान्स दिखाव.' 'साकी' चित्रपटातील

'उयी अल्ला' हे गाणं रेकॉर्ड झालेलं होतं. ते लावण्यात आलं. गोपीने त्या गाण्या-वर नृत्य करून दाखवलं. सारी मंडळी एकदम प्रभावित झाली. राजेंद्रकुमार एकदम खूश झाला. 'चाय, कॉफी क्या पियेगा?' असं त्यानं गोपीला विचारलं. त्यावेळी कोकाकोला नुकताच मुंबईत सुरू झाला होता. गोपी म्हणाला, 'मैं कोकाकोला पिऊंगा.' लागलीच कोकाकोला आणण्यात आला. तेव्हापासून आजतागायत राजेंद्र-कुमार केव्हाही गोपीला भेटला की चिडवण्यासाठी म्हणतो, 'क्या कोकाकोला पियेगा?' थोड्या वेळानं रवेल आले. हा पोरगा कसं नृत्यदिग्दर्शन करणार याचं त्यांनाही कोडं पडलं. गोपीने त्यांनापण नृत्य करून दाखवलं. त्यांनी गोपीची तारीफ केली.

त्यानंतर चित्रपटवाल्यांची रीघच लागली. वीस चित्रपटांच्या नृत्यदिग्दर्शनाचं काम आलं. संगदिल, बाजुबंद, बागी, जालियनवाला बाग, परिणिता, चाचा चौधरी, शगूफा, चिनगारी, लहरे, नास्तिक अशी किती नावे घ्यावी?

एके दिवशी रोशनकुमारीचे वडील गोपीच्या घरी गेले. व्ही. शांतारामना चित्र-पटातल्या प्रमुख भूमिकेसाठी एका नर्तक तरुणाची गरज आहे असं त्यांनी सांगितलं. गोपीनं शांताराम यांची गाठ घेतली. 'शिवशक्ती' नावाचा चित्रपट ते काढणार होते. पार्वतीचं काम करणार होती जयश्री. शंकराचं काम करायला नर्तक हवा होता. पार्वतीपुढं गोपी लहान दिसला असता. तेव्हा ती भूमिका न देता कामदेवाची भूमिका मी देऊ शकेन असे शांताराम यांनी गोपीला सांगितले. त्याआधी तुला कित-पत नृत्य येते अशी पृच्छा त्यांनी केली. गोपी म्हणाला, 'देख लिजीए ना' शांता-रामनी दुसऱ्या दिवशी त्याला बोलावलं. गोपी आपल्या साथीदारांसह गेला आणि त्याने बहारदार नृत्य केलं. शांताराम एवढे खुष झाले की त्यांनी लागलीच ५०१ रुपये गोपीला बक्षीस दिले.

काही दिवसांनी शांताराम यांनी सांगितले की, 'शिवशक्ती चित्रपट काढायचा बेत मी सोडून दिला आहे. त्याऐवजी 'झनक झनक पायल बाजे' नावाचा चित्रपट मी काढणार आहे. त्याची नायिका असेल संध्या. हिला नाचता येतं की नाही ते पहा. तिला शिकव. रात्रंदिवस संध्याला गोपीनं नृत्य शिकविलं. दोन वर्षे ही शिक-वणी चालली होती. झनक झनकचं शूटिंग चालू झालं. पहिल्याच शॉटच्या वेळी गोपीचा घसा सुकला. पाणी पिऊन त्यानं संवाद म्हटले. मग मात्र सारं सुरळीत झालं. काही घरगुती भांडणामुळं गोपी आपल्या पत्नीसह सांताक्रूझ येथील झोपड-पट्टीत राहत होता. झोपडपट्टीपासून सांताक्रूझ स्टेशन आणि लोअर परळपासून 'राजकमल' स्टुडिओपर्यंतचा प्रवास तो पायीच करे.

झनक झनक पुरं झालं. ऑपेरा हाऊसला ते ११० आठवडे चाललं. अन्य अनेक चित्रपटगृहातून त्यानं रौप्यमहोत्सव साजरा केला. झनक झनकमधला 'गिरधर' गोपीकृष्ण एकदम लोकप्रिय झाला. सर्वांमुखी त्याचं नाव झालं. त्याची कीर्ती अक्षरशः दिगंत पसरली.

'झनक झनक' चित्रपट प्रदर्शित होईपर्यंत गोपीकृष्णने कोठेही जाहीर नृत्याचा कार्यक्रम करायचा नाही अशी शांतारामबापूंनी अट घातली होती. चित्रपटाचे प्रिंट्स आणण्यासाठी ते लंडनला गेले होते. गोपीची आणि अरूण सरनाईकची दोस्ती झाली होती. त्याने गोपीला कोल्हापूरला नेलं. तेथे खूपच आग्रह झाला म्हणून काही थोड्या लोकांच्या उपस्थितीत गोपीनं नृत्य केलं. शांतारामबापू लंडनहून आले तेव्हा कोणीतरी या गोष्टीची चुगली केली. झनक...झनक चित्रपट थिएटरात लागण्याच्या आधी तू जाहीरपणे नृत्य का केलंस असं त्यांनी गोपीला विचारलं. तिकिट लावून, थिएटरमध्ये हा शो नव्हता, प्रेमाखातर मी नाचलो असं गोपीनं सांगितलं. गोपीला 'झनक, झनक'च्या चित्रपटाचे दरमहा फक्त पाचशे रुपये मिळत होते. शांतारामबापूंनी सात वर्षाचा करार करतोस का? म्हणून विचारलं. प्रत्येक वर्षी एक चित्रपट काढणार, तो यशस्वी झाला तर वार्षिक पगारवाढ २५०. चित्रपट अयशस्वी झाला तर मात्र पगारवाढ काही नाही. बाहेर कोठेही कसलंही काम घ्यायचं नाही, नृत्याचे कार्यक्रम करायचे नाहीत अशा अटी होत्या. गोपीकृष्णने हा करार स्वीकारायला नकार दिला. 'मुझे भी जवारलाल नेहरू और व्ही. शांताराम बनना है।' असं मी त्यांना सुनावलं असं गोपी सांगतो.

पुढे गोपी आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेला. प्रत्येक कार्यक्रमाला हजार रुपये मिळायचे. असे ८७ कार्यक्रम झाले. स्वतःचा बंगला बांधायचा असं गोपीचं स्वप्नं होतं. कारण तो जेथे राहत होता तेथे त्याच्या नृत्याच्या रिहर्सलसमुळे इतरांना उपद्रव व्हायचा कटकटी वाढायच्या, पोलीस यायचे. 'भू कैलाश' या ए. व्ही. एम्. च्या विविध भाषेत काढण्यात आलेल्या चित्रपटाच्या नृत्यदिग्दर्शनाबद्दल गोपीला २५ हजार रुपये मिळाले. हे सारे पैसे गोपीनं बंगला उभारण्यासाठी वापरले. त्यातून 'नटेश्वर भवन' उभं राहिलं.

या भवनात तळमजल्यावर गोपीचा नृत्याचा क्लास आहे. खारला धुरंधर मार्गावरून जाताना गोपीचं घर नेमकं कुठलं हे शोधून काढायला सायास पडत नाहीत. 'धिन...धिन...' अशा आशयाचे नृत्याचे बोल आणि घुंगुरांचा झनक झनक आवाज कितीतरी लांबवर ऐकू येतो. सकाळी गेलात तर खुद्द गोपीकृष्ण या क्लासमध्ये शिकवतो आहे असं दृश्य दिसतं. साधना, आशा पारेख, लीना चंदावरकर आदी नटयांनी येथेच नृत्याचे धडे गिरवले आहेत असं गोपी अभिमानानं सांगतो.

गोपीची पावले भारतातच नव्हे तर परदेशातही नाचली आहेत. रशिया, अमेरिका, जपान आदी देशांना त्याने भेटी दिल्या. आपल्या नुकत्याच अमेरिका दौऱ्यात त्यानें 'चंद्रविजय' नावाचे आधुनिक नृत्य पेश केलं.

काहीतरी विक्रम करायचा हेही गोपीचं एक वेड आहे. दोन वर्षापूर्वी सतत नऊ तास नाचण्याचा त्यानं विक्रम केला. नृत्याचे सारे प्रकार त्यानं सादर केले. त्याची पावलं क्षणभर विसावली नाहीत, क्षणभर रेंगाळली नाहीत. ती सतत नाचत

राहिली. 'त्यादिवशी नृत्यदेवतेनं गोपीकृष्णाला घरी पाणी भरलं.' सिताराद्देवीनं ११ तास नाचण्याचा विक्रम केलाय ना? असं मी विचारता गोपी म्हणाला, 'सितारादेवी सतत अखंडितपणे ११ तास नाचली नाही. पाच-सहा तास तर तिनं बसूनच नृत्य केलं. कपडे बदलले. माझ्यासारखं सातत्याने नऊ तास नृत्य कोणीही करून दाखवावं मी माझे पाय कापून टाकीन!'

गप्पांच्या ओघात गोपीनं आणखीही एक आव्हान दिले-'आप एक मूव्हमेंट कीजिए मैं वैसाही करके दिखाता हूँ लेकिन मैं जो करके बताऊँगा उसका आधा भी आप करके दिखाईये, मेरा चॅलेंज है।' हे मला उद्देशून नव्हतं हे नशीब!

गोपी जेव्हा नृत्याविषयी बोलतो तेव्हा आवेशानं बोलतो. सबंध मुलाखतभर त्याचा हा आवेश संपला नाही. नृत्याचे बारकावे तो समजावून सांगत होता, अमुक ठिकाणी अमुक भावमुद्रा केली तर कसं योग्य होईल हे सांगत होता.

त्याचं आपल्या जीवनावर अपार प्रेम आहे. खूप खूप वर्षं जगावं असं त्याला वाटतं. मुलाखतीचा शेवट त्यानं केला तो अशीच इच्छा व्यक्त करून आणि तेही त्याच्या भोजपुरी भाषेत-

'हम यही चाहत थई की हम तीनसो साल जी. और दुनियाके दिखा देई की नाचसे बढके और कोई चीज नाही हऽऽ!' □□□

---

एखादा चित्रपट पडला तर त्या चित्रपटाशी संबंधीत असणाऱ्या सर्वांचेच नुकसान होते. आणि समजा एखादा चित्रपट चालला, अगदी खूप चालला तरी निर्मात्याच्या हातात काय पडते? आता राजकपूरच्या संगमचेच बघा ना.

मुंबईच्या अप्सरा या चित्रपटगृहामध्ये हा चित्रपट साठ आठवडे चालला. व एकूण २४·४० लाख रुपयाचे उत्पन्न आले. त्याचे वाटेकरी खालीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| करमणूक कर : (सरकारी हिस्सा) | ७, ७०,००० रु. |
| निर्मात्याचा व वितरकाचा हिस्सा | ६, ६०,००० रु. |

पैकी राजकपूरने जाहिरातीवर २, ५०,००० रु. खर्च केला. म्हणजे साठ आठवडे चाललेल्या संगमचे त्यांना मिळालेले निव्वळ उत्पन्न फक्त ६५०,०० रु. आणि तरीही चित्रपट निर्माण होत आहेत. आता मेरा नाम जोकरचे काय होते ते पाहू. —एस्.

---

# एक चित्रप्रदर्शन

मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये श्री. पेंढारकरांचे चित्रप्रदर्शन चालू आहे. या-संपूर्ण प्रदर्शनात केवळ दोन प्रकारची चित्रे आहेत. स्थिरचित्रणात (still-life) पुष्पपात्रांची, आणि केवळ 'पेंटिंग' या नावाखाली एकाच स्त्रीच्या वेगवेगळया रूपांची चित्रे येथे आहेत. एकदोन चित्रांचा अपवाद वजा करता, बहुसंख्य चित्रांमध्ये, रंगाच्या वाहात्या रेषांचे माध्यम वापरून चित्रकाराने आकृती सादर केलेली दिसते. आजच्या चित्रप्रदर्शनात प्रामुख्याने आढळणारी अमूर्त आविष्कारपद्धती या प्रदर्शनात दिसत नसली तरी चित्रकाराने स्थिरचित्रणात पुष्पसमूह सादर करताना अमूर्त पद्धतीचा चाणाक्ष उपयोग केला आहे.

दुसऱ्या प्रकारच्या चित्रात, स्त्रीशरीराचा एक उभट आकार कल्पून त्याचे वेगवेगळे आविष्कार केले आहेत. ही आकाराची संकल्पना, भारतीय जीवनाचा आविष्कार करताना, अमृता शरगिलपासून अनेकांनी योजलेली आहे. मडक्यांच्या गोल रेषांच्या आकृतीच्या पार्श्वभूमीवर उभट रेषांनी साधलेल्या स्त्रीचे चित्र विरचना (composition) म्हणून लक्षणीय झाले नाही. झोका घेणाऱ्या स्त्रीच्या चित्रात, केसांच्या रेषांनी गती सुचवण्याचा एक उल्लेखनीय प्रयत्न दिसतो. विशेष लक्षात राहते ते कबुतरांना दाणे घालणाऱ्या स्त्रीचे, समुद्री हिरव्या रंगाच्या छटांनी साधलेले चित्र. कारण त्या चित्राला स्वतःची चित्रवृत्ती आहे. बाकी सर्व चित्र पाहताना चित्रकाराची माध्यम हाताळण्याची सफाई जाणवते, पण त्यामागे काही नवी संकल्पना नसल्याने, या चित्रकलाप्रदर्शनाला स्वतःचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व प्राप्त होत नाही. □

# दिल्ली कॉटेज इंडस्ट्रीजची शाखा

काही दुकाने म्हणून थाटलेली असली तरी स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असणारी प्रदर्शनेच होतात. दिल्लीच्या 'कॉटेज इंडस्ट्रीज' या दुकानाला असे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. याच दुकानाची शाखा मुंबईला भारत-प्रवेशद्वारानजीक निर्माण झाली आहे. वेगवेगळ्या पातळ्यांवर दुकानाचे वेगवेगळे भाग थाटलेले असून दुकानाची सजावट भारतीय शैलीने केली आहे. (या सर्व भारतीय सजावटीत झुंबरे मात्र युरोपीय शैलीची का लावली आहेत ते उमगत नाही. कदाचित ती मूळ जागेतच असतील)...तसे पाहिले तर मुंबईत 'खादी ग्रामोद्योगा 'सारखे दुकान अनेक वर्षे आहे. पण त्या दुकानात, केवळ परंपरागत वस्तू, मांडणीचा विशेष विचार न करता, नुसत्या रचून ठेवल्या जात असल्याने त्याबद्दलचे आकर्षण विरले होते. शिल्पी, नारंग, शिरोम या दुकानांनी भारतीय कारागिरीचे प्रदर्शन व

दुकानकी ही दोन्ही प्रयोजनें साधली आहेत; पण त्यांच्याकडे जागा अपुरी आहे. दिल्लीच्या या दुकान शाखेत भारतीय कलाशैलीचा आधुनिक दृष्टिकोनातून वापर केलेल्या अनेक नव्या वस्तू आहेत. त्यांचो अभिनव, आकर्षक मांडणीही आहे. परंतु अशा दुकानात विक्रेतेही उत्साही हवेत. सध्या तेथे असलेले विक्रेते बरेचसे अनभिज्ञ आणि मेंगळट वाटतात या दुकानाचो मांडणी सारखी बदलल्यास केवळ परदेशीं प्रवाशांनीच नव्हे तर मुंबकरांनीही आवर्जून भेट द्यावे', पुन्हा पुन्हा द्यावी, असे ते एक ठिकाण होईल. ◘

## नेतृत्व प्रशिक्षणाचा कार्यक्रम

'फोरम ऑफ फ्री एंटरप्राईझ' या मुंबईतील प्रतिष्ठित सस्थेनें शनिवार दि. १९ सप्टेंबर रोजी महाविद्यालयोन विद्यार्थ्यांसाठी नेतृत्व-प्रशिक्षणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. महाविद्यालयातील मंडळांच्या विविध सचीवांना 'कार्यक्रमांचे संयोजन व संचालन करण्याचे शिक्षण' तीन तासांच्या या परिसंवादातून मिळावे असा हेतू फोफ्रीएंटने बाळगला होता.

बृहन्मुंबईतील महाविद्यालयीन विद्यार्थीप्रतिनिधी या निमित्ताने एकमेकांना भेटणार होते. 'फोफ्रीएंट'ची शिस्तबद्धता नेहमीच वाखाणण्याजोगी असते. याही वेळी परिसंवादस्थली पोचल्यावर पाहिले तो कार्यक्रमाची रूपरेषा, कोरे कागद, पेन्सिल, त्याबरोबर विल ड्युरंटने विद्यार्थ्यांना उद्देशून केलेल्या भाषणाची प्रत, असे साहित्य प्रत्येक खुर्चीसमोर नीट मांडून ठेवले होते. सुमारे साठसत्तर विद्यार्थी-प्रतिनिधी मोठ्या उत्साहानें आले होते. प्रत्येक महाविद्यालयातून निदान एक तरी प्राध्यापक यावा अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात मात्र पाचसहाच प्राध्यापक उपस्थित होते. आपले विद्यार्थी काय करतात, त्यांच्यासाठी काय केले जाते याच्याशी संपर्क राखणे, या आपल्या कर्तव्यांचा बहुतेक प्राध्यापकांना विसर पडलेला दिसतो.

परिसंवादात सभागत ववतृत्वावर (public speaking) डॉ. नाझरेथ, जाहिरात-तंत्रावर (publicity) श्री. हरीश राजा आणि कार्यक्रमांचे संयोजन या विषयावर श्री. मणी यांची तीसपस्तीस मिनिटांची व्याख्याने होती. व्याख्याते आपापल्या क्षेत्रात निष्णात होते आणि तिन्ही विषय परिसंवादाच्या उद्दिष्टास पोषक होते. परंतु पुस्तकी माहिती आणि केवळ चलाख मांडणी (दर चारपाच मिनिटांनी येणारा विनोदी चुटका हा मांडणीचा एक घटक.) यामुळे या व्याख्यानांमधून विद्यार्थ्यांच्या पदरात फारसे काही पडले नाही. तिकडे प्रश्नोत्तरांमध्ये बऱ्याच विद्यार्थ्यांनीही अप्रस्तुत प्रश्न विचारून वेळ वाया दवडला. तरी 'फोफ्रीएंट'ने गतवर्षीप्रमाणे यंदाही, अनेक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना एकत्र येण्याची सुसंधी दिली हे चांगलेच झाले. परंतु असा परिसंवाद एक संपूर्ण दिवस ठेवल्यास तो अधिक उपयुक्त ठरेल असे वाटते.

—प्रतिनिधी




लेखांक : एकोणीस

स्टॅलिनची चाल आता बदलली होती. ब्रिटन आणि फ्रान्स यांना आपल्याशिवाय गत्यंतर उरलेले नाही याची खात्री पटताच, त्याच्या मनात निराळेच विचार

येऊ लागले. हिटलरच्या आक्रमणापासून पूर्व आणि मध्य युरोपचे संरक्षण करण्याच्या निमित्ताने या विशाल भूभागावर आपुले लष्करी वर्चस्व प्रस्थापित करण्याची ही चांगली संधी चालून आली आहे हे त्याने ओळखले. म्हणजे, हिटलरच्या अगोदर आपणच जर्मनी आणि रशिया यामधील छोटी छोटी राष्ट्रे गिळंकृत करावीत या दृष्टीने स्टॅलिन वाटाघाटीचे जाळे टाकू लागला.

हिटलरच्या धमक्यांनी फ्रान्स आता एवढा खचून गेला होता की, कसेही करून रशियाशी आपण करार केला पाहिजे हे चेंबर्लेनला पटविण्याचा दलादिए आणि बॉन्ने यांनी खटाटोप आरंभिला. चेंबर्लेनची खळखळ सुरूच होती. हिटलरला रोखण्याइतके रशियाजवळ लष्करी सामर्थ्य आहे हे त्याला मान्य नव्हते. परिस्थिती दिवसादिवसाला चिघळत असताना चेंबर्लेनने स्वस्थ बसावे हे पाहून ब्रिटिश लोकमत बिथरू लागले. मेच्या शेवटच्या आठवड्यात हाऊस ऑफ कॉमन्समध्ये झालेल्या चर्चेच्या वेळी तर विन्स्टन चर्चिल, लॉईड जॉर्ज आणि अँथनी ईडन यांनी चेंबर्लेनच्या दुबळ्या आणि निष्क्रिय परराष्ट्रीय धोरणाचे वाभाडे काढले. शेवटी चेंबर्लेन कसाबसा रशियाशी वाटाघाटी करायला तयार झाला. त्याने मॉस्कोतील आपल्या राजदूताला मोलोटोव्हची भेट घेण्याचा आदेश दिला.

परंतु एवढ्या महत्त्वाच्या विषयासंबंधी राजदूताशी विचारविनिमय करायला मोलोटोव्ह उत्सुक नव्हता. ब्रिटिश परराष्ट्रमंत्री लॉर्ड हॅलिफॅक्स याने मॉस्कोला यावे असे त्याने सुचविले. परंतु, 'तूर्त परदेशी जाणं मला शक्य नाही' असे सांगून हॅलिफॅक्स याने मॉस्कोला जायला नकार दिला. यावेळी अँथनी ईडन मंत्रिमंडळामध्ये नव्हता. परंतु तरीदेखील त्याने मोलोटोव्हशी चर्चा करण्यासाठी मॉस्कोला जाण्याची तयारी दर्शविली. या साऱ्या प्रकरणाबाबत चेंबर्लेन इतका उदासीन होता की त्याने विल्यम स्ट्रँग नावाच्या परराष्ट्रखात्यातील एका अधिकाऱ्याला धाडले. ब्रिटन आणि रशिया यांच्या दरम्यान परस्पर-सहाय्याचा करार करण्यासाठी ब्रिटिश प्रधानमंत्र्यांनी आपल्या एका मामुली अधिकाऱ्याला मॉस्कोला पाठवावे ही गोष्ट रशियन नेत्यांना मुळीच आवडणार नाही असे चर्चिलने बजावले; परंतु या बाबतीत चेंबर्लेन कोणाचेही ऐकायला तयार नव्हता.

ब्रिटन आणि फ्रान्स यांच्याशी करार करताना, रशियाला या दोन राष्ट्रांकडून कोणती आश्वासने हवी आहेत हे मोलोटोव्हच्या ३१ मेच्या भाषणावरून स्पष्ट झाले. परराष्ट्रमंत्रिपद स्वीकारल्यानंतर त्याचे हे पहिलेच जाहीर भाषण होते. या भाषणात तो म्हणाला, "युरोपमधील संभाव्य आक्रमण थोपविण्यासाठी रशियाच्या मदतीने एक फळी उभारावी अशी जर अॅंग्लो-फ्रेंचांची खरोखरच इच्छा असेल तर त्यांनी त्रिपक्षीय करार करण्याबाबत दिरंगाई करता कामा नये. त्याचप्रमाणे मध्य आणि पूर्व युरोपमधील व विशेषत: ज्या राष्ट्रांच्या सीमा रशियाला भिडलेल्या आहेत त्या सर्व राष्ट्रांच्या संरक्षणाची जबाबदारी घ्यायला सिद्ध असले पाहिजे.

त्याचप्रमाणे ब्रिटन-फ्रान्स आणि रशिया यांनी परस्परांना करावयाच्या लष्करी मदतीचा तपशीलही परस्परांना कळवायला हवा."

रशियाचे मनोगत स्पष्ट झाले होते. पूर्व आणि मध्य युरोप आपल्या नियंत्रण-क्षेत्राखाली आणायला स्टॅलिन अधीर झाला होता.

जाहीर भाषण आटोपून मोलोटोव्ह क्रेमलिनमध्ये परतताच त्याने ब्रिटिश आणि फ्रेंच राजदूतांना बोलावून घेऊन सांगितले, "नुसता मध्य आणि पूर्व युरोपचा विचार करून चालणार नाही. लॅटव्हिया, एस्टोनिया आणि लिथुआनिया या तीन बाल्टिक राष्ट्रांच्या आणि फिनलंडच्या संरक्षणाचीही जबाबदारी आपल्यालाच स्वीकारली पाहिजे.

"पण त्यांना जर आपल्या मदतीची गरज नसेल तर–" फ्रेंच राजदूताने शंका विचारली.

मोलोटोव्ह उत्तरला, "त्यांच्या संमतीची आपल्याला फिकीर नाही. इतकंच नव्हे तर त्यांनी विरोध केला तर तोदेखील आपण जुमानता कामा नये."

तीन बाल्टिक राष्ट्रे आणि फिनलंड यांच्याबद्दलचा रशियाचा दृष्टिकोन स्पष्ट झाला होता. या राष्ट्रांना आपली मदत हवी आहे की नाही हा रशियाच्या दृष्टीने प्रश्नच नव्हता. त्याला आपली 'मदत' या राष्ट्रांवर लादायची होती. हा बारकावा फ्रेंच राजदूताच्या लक्षात आला नाही. तो म्हणाला, "ठीक आहे. मोलोटोव्ह यांचं म्हणणं रास्त आहे."

ब्रिटिश राजदूत त्यामानाने सावध होता. तो म्हणाला, "एखाद्या देशाच्या इच्छेविरूद्ध आपण त्याच्यावर मदत लादण्याची कल्पना मला पटत नाही."

मोलोटोव्ह उत्तरला, "हा पटणं – न पटण्याचा प्रश्नच नाही. हा आपल्या गरजेचा प्रश्न आहे."

स्टॅलिनच्या मनात कोणते स्वप्न तरळत आहे हे पोलंड आणि रूमेनिया यांच्या-प्रमाणेच बाल्टिक राष्ट्रांनाही ठाऊक होते आणि त्यामुळेच 'आम्हाला रशियाचं संरक्षण नको' अशी त्या राष्ट्रांची भूमिका होती. परंतु त्या भूमिकेकडे आपण आता दुर्लक्ष केलं पाहिजे असे फ्रेंच परराष्ट्रमंत्री बॉन्ने याला वाटले. त्याने लॉर्ड हॅलिफॅक्सला कळविले, "मध्य आणि पूर्व युरोपातील राष्ट्रांची इच्छा असो वा नसो, त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी रशियावर सोपवायला आपण तयारी दर्शविली नाही तर रशिया त्रिपक्षीय करारात सहभागी होणार नाही." बॉन्ने यांच्या या पत्रानंतर ब्रिटनने आपला आग्रह मागे घेतला.

यानंतर ब्रिटन, फ्रान्स आणि रशिया यांच्या प्रतिनिधींमध्ये त्रिपक्षीय कराराच्या तपशीलासंबंधी वाटाघाटी सुरू झाल्या. रशियन प्रतिनिधीने 'अप्रत्यक्ष आक्रमणांचा उल्लेख करताच पुन्हा रशिया आणि ब्रिटन यांच्यातील मतभेद उफाळून आले. एखाद्या देशावर अप्रत्यक्ष आक्रमण होण्याचा संभव दिसताच आपण त्याच्या

मदतीला गेलें पाहिजे असे रशियन प्रतिनिधीने सुचविताच ब्रिटश प्रतिनिधी म्हणाला, " एखाद्या देशावर आक्रमण होणार आहे किंवा झालेलं आहे हे तिऱ्हाईतानं ठरविणं चुकीचं आहे. याचाच अर्थ असा की जो देश आपल्याकडे मदतीची याचना करील त्याच्याच आपण मदतीला जावं."

हा आक्षेप रशियन प्रतिनिधीला मान्य होणे शक्यच नव्हते. आक्रमणाची सबब सांगून एखाद्या देशात आपले सैन्य घुसविणे शक्य व्हावे यासाठी तर त्याने 'अप्रत्यक्ष आक्रमणा'चा मुद्दा काढला होता. हा मुद्दा विशद करताना मोलोटोव्ह म्हणाला, " नुकताच चेकोस्लोव्हाकिया परकीय आक्रमणाला बळी पडलेला आहे. परंतु तेथलं सरकार परिस्थितीच्या दडपणामुळे तशी कबुली देणार नाही. तीच गोष्ट बाल्टिक राष्ट्रांची. आपला विनाश टाळावा म्हणून ही राष्ट्रं उद्या जर्मन सैन्याला निमंत्रण देऊन बोलावतील. अशा वेळी आपण स्वस्थ बसायचं की काय? तसं केलं तर अल्पावधीत हिटलरचं सैन्य आमच्या सीमेपाशी येऊन भिडेल. म्हणून जिथं कुठं हिटलरचं आक्रमण होण्याचा आपल्याला संभव वाटेल तिथं आपण तात्काळ आपलं सैन्य धाडलं पाहिजे."

'अप्रत्यक्ष आक्रमणा'संबंधी ही अशी चर्चा चालू असतानाच मोलोटोव्हने आणखी एक मुद्दा मांडला. लष्करी मदतीबद्दलचा करार केल्याशिवाय सर्वसाधारण स्वरूपाचा त्रिपक्षीय करार करायला आम्ही तयार होणार नाही असे त्याने सांगताच बैठकीचे वातावरण तंग झाले. ब्रिटिश आणि फ्रेंच प्रतिनिधींनी रशियाची ही नवी अट आपापल्या परराष्ट्रमंत्र्याला कळविली. आतापर्यंत रशियाबाबत नमते घेणारा बॉन्नेदेखील ही चमत्कारिक अट ऐकून खवळला. तो म्हणाला, " हे कसं शक्य आहे ? ब्रिटन फ्रान्स आणि रशिया या तीन राष्ट्रांदरम्यान परस्पर-मैत्रीचा करार झाल्यानंतरच कोणता देश किती लष्करी मदत करू शकेल यासंबंधीची बोलणी केली पाहिजेत."

याबाबतीत मोलोटोव्ह आग्रही आहे हे कळल्यानंतर बॉन्ने याने तडजोड सुचविली. त्याने मोलोटोव्हला कळविले-" प्रथम आपण मैत्रीचा करार करू या आणि त्या करारात असं म्हणू या की लष्करी मदतीचा तपशील निश्चित झाल्याशिवाय हा करार अंमलात येणार नाही. म्हणजे रशियाला आमच्याकडून हवी असलेली हमीही मिळेल आणि करारासंबंधीची नेहमीची पद्धतही पाळली जाईल."

चेंबर्लेनची प्रतिक्रिया थोडीशी वेगळी होती. तो म्हणाला, " या साऱ्या वाटाघाटीत रशिया आपल्या एकट्याचीच सोय बघत आहे. अशा परिस्थितीत त्याची प्रत्येक मागणी मान्य करणं शक्यच नाही. शिवाय आपण त्याचा एक हट्ट मानला की लगेच दुसरी अट पुढे येते असा अनुभव आहे."


चेंबर्लेन याचा हा आक्षेप बरोबर होता. स्टॅलिन हिटलरचेच तंत्र अवलंबत असल्याचाच हा पुरावा होता. दलादिए किंवा बॉन्ने याला हे कळत नव्हते असे

नाही. परंतु रशियाबरोबर आरंभिलेल्या वाटाघाटी मोडणे, रशियाच्या अटी मान्य करण्यापेक्षाही अधिक घातक ठरेल या विचाराने फ्रेंच नेते गप्प बसत होते. आणि आपल्याप्रमाणे ब्रिटननेहीं गप्प बसावे अशी त्यांची अपेक्षा होती.

आपण प्रत्येक बाबतीत आपलाच हेका चालविला तर कदाचित या वाटाघाटी फिसकटतील याची मोलोटोव्हलाही भीती वाटत होती. त्यामुळे त्याने ब्रिटिश आणि फ्रेंच राजदूतांना कळविले, "तसे पाहिले तर बऱ्याच मुद्यांच्या बाबतीत आपल्यात एकमत झालेलं आहे. 'अप्रत्यक्ष आक्रमणा'च्या व्याख्येबाबतचा मतभेद त्यामानानं मामुली आहे; म्हणून त्याचा विचार तूर्त सोडून देऊ."

येथवर हे पत्र ठीक होते. परंतु मुख्य मुद्दा सोडायला रशियाची बिलकुल तयारी नाही हे पुढल्या वाक्यावरून स्पष्ट होत होते. मोलोटोव्हने म्हटले होते–"हिटलरला रोखण्यासाठी ब्रिटन, फ्रान्स आणि रशिया किती लष्करी सामर्थ्य उभे करू शकतात याची आपण आता चर्चा करू या."

रशिया आपला मित्र होणार आहे की नाही हे कळण्यापूर्वीच त्याच्याशी लष्करी गुपितांबद्दल बोलणे करणे चेंबर्लेनला प्रशस्त वाटत नव्हते. परंतु रशियाशी करार करायला बॉन्ने यावेळी इतका अधीर झाला होता की त्याने लष्करी वाटाघाटी करण्यासाठी जनरल दूमेन्क याला मॉस्कोला धाडले. त्यामुळे चेंबर्लेनला एकट्याला विरोधी धोरण स्वीकारणे शक्य नव्हते. जनरल दूमेन्क याच्या पाठोपाठ ॲडमिरल ड्रॅक्स याच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश लष्करी शिष्टमंडळही मॉस्कोत जाऊन दाखल



झाले, मात्र चेंबर्लेनने ड्रॅक्स याला कानमंत्र दिला होता–" रशियाशी मैत्री चा करार होईपर्यंत लष्करी वाटाघाटी रेंगाळत ठेव. आपल्या लष्करी तयारीची गुपितं काढून घेण्याचा रशियन प्रतिनिधी प्रयत्न करतील. परंतु त्रिपक्षीय करार झाल्यानंतरच त्यासंबंधी बोलणे करायचे."

दलादिए याने दूमेन्क याच्या नेमका उलट सल्ला दिला. त्याचा निरोप घ्यायला दूमेन्क आला तेव्हा तो म्हणाला, "कोणतीही किंमत द्यावी लागली तरी हरकत नाही. परंतु रशियाशी लष्करी करार करूनच परत ये."

ब्रिटिश, फ्रेंच आणि रशियन लष्करी शिष्टमंडळांच्या बारा ऑगस्टपासून मॉस्को येथे वाटाघाटी सुरू झाल्या. रशियाच्या वतीने संरक्षणमंत्री मार्शल व्होरोशिलोव्ह आणि सरसेनानी जनरल शापोश्निकोव्ह यांनी या बैठकीत भाग घेतला. प्रारंभीचे औपचारिक बोलणे आटोपताच व्होरोशिलोव्ह याने मुद्द्याचा प्रश्न काढला. तो म्हणाला, "जर्मनी आणि रशिया यांची सीमा परस्परांशी भिडलेली नाही. त्यामुळे जर जर्मनीनं पोलंड किंवा रुमेनिया या देशात सैन्य घुसवलं तर त्या सैन्याला रोखण्यासाठी आमच्या सैन्याला या देशामध्ये प्रवेश करण्याचा अधिकार मिळणार आहे की नाही हे अगोदर स्पष्ट व्हायला हवं. मला या प्रश्नाचं उत्तर उद्याच मिळालं पाहिजे."

दुसऱ्या दिवशी बैठक सुरू होताच व्होरोशिलोव्हने तो प्रश्न पुन्हा उपस्थित केला तेव्हा जनरल दूमेन्क म्हणाला, "आपापल्या सीमांचं संरक्षण करण्याची जबाबदारी पोलंड आणि रुमेनिया या देशांवर आहे. त्यांनी जर आपली मदत मागितली तरच आपण त्यांच्या मदतीला जावं."

"परंतु तत्पूर्वीच जर्मन सेनेनं तो देश गिळंकृत केला तर–" व्होरोशिलोव्हने प्रतिप्रश्न केला.

अॅडमिरल ड्रॅक्स उत्तरला, "तसं होणार नाही. जर्मन सैन्य सीमेपाशी येताच ते देश आपली मदत मागतीलच, आणि समजा जर त्यांनी आपली मदत मागितली नाही तर जर्मनीचे आक्रमण त्यांना हवं आहे असं मानलं पाहिजे. एखादा देश स्वेच्छेनं जर्मनीच्या अंकित झाला तर त्याला आपण काय करणार?"

रशियाला नेमकी हीच गोष्ट टाळायची होती. जर्मन सेना थेट आपल्या सीमेपर्यंत येऊन भिडावी ही गोष्ट रशियाला मान्य होणे शक्य नव्हते. जर्मनीबरोबरचे युद्ध दुसऱ्या कोणत्यातरी देशाच्या भूमीवर लढता यावे यासाठीच तर जर्मनी आणि रशिया यांच्या दरम्यान उभ्या असलेल्या कोणत्याही देशात सैन्य घुसविण्याची स्टॅलिनला ब्रिटन–फ्रान्सकडून अधिकृत कबुली घ्यायची होती.

त्यामुळे अॅडमिरल ड्रॅक्स याचे उत्तर ऐकताच व्होरोशिलोव्होचा चेहरा रागाने लाल झाला. तो म्हणाला, "माझ्या प्रश्नाला तुमच्याकडून स्पष्ट उत्तर मिळालेलं नाही. तसं उत्तर मिळणार नसेल तर या वाटाघाटी चालू ठेवण्यात काहीच स्वारस्य नाही."

दूमेन्क आणि ड्रॅक्स यांनी आपापसात विचारविनिमय करण्यासाठी थोडी वेळ मागून घेतली. त्यानंतर अँग्लो-फ्रेंच शिष्टमंडळांच्या वतीने तयार करण्यात आलेले उत्तर जनरल हेवूड या ब्रिटिश अधिकाऱ्याने वाचून दाखविले. त्या उत्तरात म्हटले होते–' पोलंड आणि रुमेनिया हे देश सार्वभौम आहेत हे विसरून चालणार नाही. त्यामुळे या दोन देशांमध्ये आपले सैन्य घुसवायला जर रशियाला परवानगी हवी असेल तर ती त्याने संबंधित देशांकडे मागावी. कारण हा लष्करी प्रश्न नसून राजकीय प्रश्न आहे आणि या प्रश्नाची सोडवणूक सोव्हिएत सरकारने त्या त्या देशांच्या सत्ताप्रमुखांकडून करून घेणेच सर्व दृष्टींनी उचित ठरेल."

हे उत्तर ऐकल्यानंतर व्होरोशिलोव्ह याने स्टॅलिनशी चर्चा करण्यासाठी एक तासाची वेळ मागितली. त्याप्रमाणे स्टॅलिनशी टेलिफोनवरून बातचित केल्यानंतर व्होरोशिलोव्ह दूमेन्क आणि ड्रॅक्स यांना म्हणाला, "पोलंड आणि रुमेनिया हे सार्वभौम देश आहेत हे आम्हालाही माहीत आहे. अन् म्हणूनच त्यांच्या प्रदेशातून आमचं सैन्य नेण्याची आम्हाला परवानगी मिळवून द्या अशी आम्ही ब्रिटन आणि फ्रान्स यांना विनंती करीत आहोत. आम्हाला ही परवानगी मिळवून देण्याची जबाबदारी ब्रिटन-फ्रान्सवर आहे. कारण पोलंड आणि रुमेनिया यांना मदत करण्याची हमी तुम्ही घेतलेली आहे; रशियानं नव्हे. अशा परिस्थितीत आमच्या मागणीबाबत आम्हाला जर तुमच्याकडून निश्चित उत्तर मिळणार नसेल तर लष्करी वाटाघाटी अयशस्वी होतील आणि त्याची जबाबदारी तुमच्यावर राहील."

व्होरोशिलोव्हचे हे अंतिमोत्तर ऐकल्यानंतर ब्रिटिश राजदूत सर विल्यम सीड्स याने लंडनला तार केली–" रशियन सेनेला पोलिश प्रदेशात प्रवेश करण्याची परवानगी मिळविण्याबाबत पोलंडवर दडपण आणले गेले पाहिजे आणि तसे आम्हाला ताबडतोब कळविण्यात आले पाहिजे. तसे घडले नाही तर सध्या सुरू असलेल्या वाटाघाटी कोसळल्याच म्हणून समजा."

जनरल दूमेन्क याने बॉन्नेे यालाही अशाच आशयाची तार केली. पंधरा ऑगस्टला पहाटे पाच वाजता त्याला ही तार मिळाली. यावेळी पॅरिसमधील पोलिश राजदूत लुकासिविझ ब्रिटनी येथे विश्रांतीसाठी गेला होता. त्यामुळे बॉन्ने याने त्याला फोन करून पॅरिसला तातडीने परत यायला सांगितले. त्याप्रमाणे लुकासिविझ पॅरिसला परतला. बॉन्ने त्याला म्हणाला, " जर पोलंडला आपला विनाश टाळायचा असेल तर त्यानं रशियन सैन्याला आपल्या प्रदेशात येण्याची मुभा दिली पाहिजे."

" ते शक्य नाही." लुकासिविझने उत्तर दिले.

बॉन्ने म्हणाला, " पोलंडचा आपण तीन आठवड्यात फडशा पाडू असं हिटलर नुकतच म्हणाला ते ध्यानात आहे ना ?"

लुकासिविझ् कोठल्या तंद्रीत वावरत होता कोणास ठाऊक! तो उत्तरला, "उलट आम्हीच जर्मनीवर हल्ला चढविणार आहोत."

लुकासिविझ ऐकत नाही हे पाहिल्यानंतर पोलिश परराष्ट्रमंत्री कर्नल जोसेफ बेक याला जाग आणण्याचा बॉन्ने याने प्रयत्न केला. सोळा ऑगस्टच्या रात्री त्याने वॉर्सातील आपला राजदूत लिऑं नोएल याला तार केली–" हिटलरचं आक्रमण थोपविण्यासाठी ब्रिटन, फ्रान्स आणि रशिया यांनी आपल्या पाठीशी उभे रहावे अशी जर पोलंडची इच्छा असेल तर रशियन सेनेच्या वाहतुकीला पोलंडने परवानगी दिलीच पाहिजे ही वस्तुस्थिती तू बेक याला समजावून सांग. जर्मनीचं प्रत्यक्ष आक्रमण होईपर्यंत वाट पाहणं सर्वांनाच घातक ठरणार आहे. त्यामुळे बेक याने ही मागणी ताबडतोब मान्य केली नाही तर मॉस्का येथं सुरू असलेल्या वाटाघाटी मोडतील आणि पुढच्या परिणामाला तोंड देण्याची जबाबदारी एकट्या पोलंडला स्वीकारावी लागल."

या तारेप्रमाणे नोएल याने बेक याची भेट घेतली. बेक उत्तरला, "आम्ही जर रशियन सेनेला आमच्या प्रदेशातून वाहतूक करण्याची परवानगी दिली तर हिटलर लगेच आमच्यावर हल्ला करील आणि त्यावेळी रशिया आमच्या मदतीला येईलच असा आम्हाला भरवसा वाटत नाही. शिवाय आज तरी हिटलरशी झुंज घण्याइतकं रशियाजवळ लष्करी सामर्थ्य नाही."

नोएल म्हणाला, "परिस्थिती किती गंभीर झाली आहे हे नीट लक्षात घ्या."

बेक उत्तरला, "एकदा का रशियन फौजा आमच्या भूमावर घुसल्या की त्या इथून हलणार नाहीत हे आम्हाला पक्कं माहीत आहे. म्हणून आम्ही आतापर्यंत रशियाशी लष्करी मदतीचा करार केलेलाही नाही आणि पुढही करणार नाही. याबाबतीत आमचं मत वदलणं अशक्य आहे."

पोलंडकडून हेच उत्तर ऐकायला मिळणार याची इतर कोणाहीपेक्षा स्टॅलिनला अधिक चांगली कल्पना होती. त्यामुळेच एकीकडे व्होरोशिलोव्ह, दूमेन्क आणि ड्रॅक्स यांच्याशी वाटाघाटी करीत असताना मोलोटोव्ह जर्मन राजदूत शुलेनबर्ग याच्याबरोबर रुसो-जर्मन कराराचा तपशील ठरवित होता.

पधरा ऑगस्टला शुलेनबर्गने मोलोटोव्हला सांगितले–" आताच मला रिबन्ट्रॉपची तार आलेली आहे. सर्व विवाद्य प्रश्नांबाबत तुमच्याशी प्रत्यक्ष चर्चा करायला मॉस्कोला यायची त्याची तयारी आहे."

मोलोटोव्ह उत्तरला. "ठीक आहे. जर्मनी आणि रशिया यांच्यातले संबंध सुधारले तर आम्हाला आनंदच वाटेल. इतकंच नव्हे तर जर्मनीशी अनाक्रमणाचा करार करायला देखील आमची तयारी आहे. एकदा या संबंधी खुलासेवार बोललं पाहिजे."

मोलोटोव्हशी झालेले बोलणे शुलेनबर्गने टेलिफोनवरून रिबेंट्रापला सांगताच तो शुलेनबर्गला म्हणाला, "आम्ही तुमच्याशी अनाक्रमणाचा करार करायला तयार आहोत हे तू मोलोटोव्हला जाऊन सांग."

स्टॅलिनशी अनाक्रमणाचा करार करण्यात हिटलरला फायदाच होता. या करारामुळे मूळ वेळापत्रकानुसार पोलंडवर स्वारी करायला काय किंवा त्यासाठी अँग्लो–फ्रेंचांचे शत्रुत्व ओढवून घ्यायला काय त्यास पर्वा करायचे कारण उरणार नव्हते.

त्याप्रमाणे तेवीस ऑगस्टला रिबेनट्रॉप मॉस्कोत येऊन दाखल झाला आणि त्याच दिवशी संध्याकाळी रुसो-जर्मन अनाक्रमणाच्या करारावर रिबेनट्रॉप आणि स्टॅलिन यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

जर्मनी आणि रशिया या दोन बलाढ्य अन् महत्त्वाकांक्षी सत्तांच्या कात्रीत सापडलेल्या पोलंडला आता अंधाराशिवाय काहीही दिसत नव्हते.

ब्रिटन आणि फ्रान्स यांना एक नवेच आव्हान मिळाले होते. चेंबर्लेनने हिटलरला कळविले– "ब्रिटन आपल्या सर्व शक्तीनीशी पोलंडच्या पाठीशी उभे राहील हे लक्षात ठेवा."

हिटलर उद्‌गारला, "ठीक आहे. ब्रिटननं आमच्यावर हल्ला चढविला तर आम्हीही स्वस्थ बसणार नाही. मग भले त्यापायी युरोपमध्ये महायुद्ध भडकलं तरी मला त्याची पर्वा नाही."

दोन दिवसांनी हिटलरचा सूर बदलला. त्याने ब्रिटिश राजदूत सर नेव्हिल हेंडरसन यास बोलवून घेऊन सांगितले. "एकदा पोलंडचा प्रश्न मी निकालात काढला की मला आणखी काही नको आहे. म्हणून यावेळी जर ब्रिटन गप्प बसलं तर मी त्याच्या साम्राज्याला हात लावणार नाही."

हेंडरसन निघून गेल्यानंतर हिटलरने फ्रेंच राजदूत कोलेन्द्र याला बोलवून घेतले. पोलंडवरील आपल्या स्वारीच्या वेळी ब्रिटनप्रमाणेच फ्रान्सनेही गप्प बसावे अशी



त्याची अपेक्षा होती. त्यामळे तो कोलेन्द्र यास म्हणाला, "फ्रान्ससंबंधी माझ्या मनात मुळीच शत्रुत्व नाही. त्यामुळे पोलंडवरून जर्मनी आणि फ्रान्स यांच्या दरम्यान युद्ध सुरू व्हावं ही कल्पनादेखील मला सहन होत नाही. मी आपण होऊन फ्रान्सवर हल्ला करणार नाही; परंतु फ्रान्स जर पोलंडच्या मदतीस गेला तर मात्र मी फ्रान्सला क्षमा करणार नाही. म्हणून एखाद्या लहानशा प्रश्नावरून फ्रेंच आणि जर्मन जनतेचं रक्त सांडलं जावं असं मला वाटत नाही. तू ही गोष्ट दलादिए यांना समजावून सांग."

हिटलरचा हा निरोप कळल्यानंतर दलादिएने त्याला पत्र लिहिले– "गेल्या महायुद्धात तुमच्याप्रमाणे मीही एक सैनिक होतो आणि त्यामुळे युद्ध किती विनाशकारी ठरते हे मला माहीत आहे. जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारावे असे मलाही वाटत नाही. पण त्याचबरोबर हेही खरे आहे की कोणत्याही राष्ट्राच्या सहनशीलतेला मर्यादा असते. पोलंडला आम्ही मदतीचा शब्द दिलेला आहे आणि त्या शब्दाला जागण्याचा आमचा निर्धार आहे. त्यामुळे युद्ध टाळायचे की नाही हे सर्वस्वी तुमच्याच हातात आहे."

हे पत्र आल्यावर हिटलर चार पाच दिवस अस्वस्थ होता.

व्हर्साय कराराचा शेवटचा अवशेष स्वतंत्र डॉन्झिग बंदराच्या रूपाने अद्याप झळकत होता. पूर्व प्रशियाला मुख्य जर्मन भूमीपासून अलग पाडणारा पट्टा पोलंडचा प्रदेश म्हणून गिरविला जात होता. पहिल्या महायुद्धाला प्रारंभ होण्यापूर्वी जसा आणि जेवढा जर्मनी अस्तित्वात होता तसा आणि तेवढा जर्मनी युरोपच्या मानचित्रावर पुन्हा मुद्रांकित करील अशी गर्जना करणाऱ्या या जर्मन हुकूमशहाला आता माघार घेऊन चालण्यासारखे नव्हते. त्याचप्रमाणे ब्रिटन आणि फ्रान्स यांच्याशी युद्ध पुकारण्यातील धोकाही त्यास माहीत होता.

– आणि तरीही हा महागडा जुगार खेळणे त्याला भाग होते.

३१ ऑगस्ट १९३० या दिवशी हिटलरने आपल्या सरसेनानीला सांगितले– 'उद्या पहाटे पावणे पाच वाजता आपली सेना पोलंडमध्ये घुसलीच पाहिजे.'


पॅरिसच्या सुकुमार कायेवर सर्रकन् काटा उभा राहिला.

(क्रमशः)

---

**पुढील लेखांक : शनिवार दिनांक १० ऑक्टोबर अंक**

---



विचारांचा अस्पष्ट ठसा ठेवून जाणारी

# शतपावली

काही काहीं पुस्तकांवर लिहिताना थोडेसे अडचणीचे होते. पुस्तक टाकाऊ असले, तर तसे स्वच्छ लिहायला प्रत्यवाय नसतो. ते चांगल्यापैकी असेल तर तसेही लिहिता येते. अधले मधले पुस्तक असले म्हणजे मात्र त्यावर अभिप्राय देणे काहीसे कठीण जाते. पुस्तकाला बऱ्यापैकी म्हणावे, तर त्यावर अन्याय तर होत नाही ना असाही विचार मनात येऊन जातो.

'मधुकर' यांच्या 'शतपावली' या पुस्तकासंबंधी असेच झाले आहे. (आणि त्यातून परीक्षण कर्त्याला पेचात पकडायची सोय लेखकाने मोठ्या चतुराईने आपल्या एका निबंधात केली आहे ! )

कित्येकदा होते काय की पुस्तकाचा लेखक नवा असतो, त्यामुळे 'नवेपणा'ची एक उत्सुकता त्याचे लिखाण वाचण्यात असते. अनपेक्षितपणे त्यात काही चांगले मिळून जाते. नव्या लेखकाची कथा-कादंबरी वाचताना मन अधिक साशंक असते. ह्या क्षेत्रातले लेखन 'गवता ऐसे!' निबंध-लघुनिबंध हा प्रकार त्या मानाने मागे पडलेला. गेल्या काही वर्षात तर करंदीकर–पाडगावकर यांचे अपवाद वगळता (आणि त्यांचेही ह्या प्रकारचे लेखन आता दुर्मिळ होऊन राहिले आहे) ह्या क्षेत्रात लक्षणीय लेखन क्वचितच आढळते. म्हणनच 'मधुकरां'च्या या पुस्तकाविषयी उत्सुकता वाटत होती.

जयवंत चुनेकर

'शतपावली' वाचून पुरे केले आणि त्याची मनावर झालेली प्रतिक्रिया तपासू लागलो. सारखे वाटत राहिले, ह्या पुस्तकाने उमटवलेला ठसा बराचसा अस्पष्ट आहे. त्यातून मिळालेला अनुभव उत्कट नाही. परिणामाच्या दृष्टीने समाधान देणारा वाटत नाही.

अपेक्षित परिणाम साधत नाही याची एकानेक कारणे संभवतात. स्वतंत्रपणे एखादे लेखन वाचताना त्यातले गुणदोष-उणीवा लक्षात येत नाहीत. परंतु संग्रहातील त्यांचे संकलन वाचताना मात्र त्या ठळकपणे लक्षात येण्याची शक्यता असते.

'शतपावली'तले निबंध वाचल्यानंतर असाच अनुभव आला. मधुकरांनी लघुनिबंधाचा बाज पकडला असला तरी त्याचे पोत मात्र निखळ लघुनिबंधाचे राहिलेले नाही. (पृ. ९ वरील स्पष्टीकरण पाहावे. लघुनिबंधाच्या घाटाला ते छेदणारे आणि म्हणूनच अनावश्यक आहे.) 'प्राधान्येन व्यपदेशः' ह्या न्यायाने हा संग्रह लघुनिबंधांच्या आहे, असे म्हटले पाहिजे.

तसे पाहायला गेले तर मधुकरांनी आपल्या निबंधांतून काही वैशिष्ट्यपूर्ण विचार मांडले आहेत असे नव्हे. किंबहुना काही काही वेळा तर ह्या लेखनाचे स्वरूप वैचारिक निबंधासारखेच ठोकळ विचार सांगणारे असे राहिले आहे. 'कायदा, हातभट्टी आणि मी' किंवा 'लहान ती चोरी, मोठी हुषारी' किंवा 'अखेर सारी सौदेबाजी' हे निबंध ह्या संदर्भात उद्धृत करता येतील. प्रस्तुत निबंधांतून उपरोध व्यक्त झालेला दिसतो. पण तो सरळसरळ निवेदनातूनच व्यक्त झालेला. ह्या प्रकारच्या लेखनात सूक्ष्मता, तरलता आढळत नाही. ('संध्या समयी सागरतीरी' सारख्या लघुनिबंधांतून तरलता भासमान होते; प्रत्यक्षात मात्र तो कल्पनांचा खेळ वाटतो.) 'पुणेकर आणि मुंबईवाला' हा लघुनिबंधही (?) थोडाबहुत असाच; फसलेला. पहिली दोन पाने अप्रयोजक आहेत; तर पुढे येत राहाते, ते सारे मुंबई आणि पुणे ह्या शहरांचे आणि त्यांनी बांधलेल्या माणसांचे तुलनात्मक वर्णन. ते त्यापूर्वीच कुठे ना कुठे तरी वाचलेले असते, ऐकलेले असते.

संग्रहात एकत्रित आल्यामुळे असेल कदाचित परंतु कल्पनांची पुनरुक्तीही लेखकाला टाळता आलेली नाही. 'प्राणि-संग्रहालयात मी' आणि 'मृत्यूचा गोल' ह्यातली 'कंट्रोल'ची कल्पना पाहावी. दोन्ही ठिकाणी त्यांनी काही वेगळा अर्थ दिला आहे असेही नाही. 'कोश करून राहिलेले शब्द,' 'शब्द बोलतात' ह्यातही पुनरुक्तीचा हा दोष आहेच. (ह्या दोन्ही निबंधांवर करंदीकरांच्या 'मी आणि व्याकरण,' खोडलेले शब्द,' 'कोश आणि कैवल्य,' ह्या निबंधांतील कल्पनांची–छाया पडली असावी काय ?)

'पंचतंत्राचा नायक' अशा एखाद्या अगदीच सपक निबंधानेही संग्रहाची जागा उगीचच अडवली आहे. या निबंधात खरोखरच काही हाती लागत नाही. पंचतंत्रातल्या काही गोष्टींचा सारांश देऊन कोल्हा हा नायक आहे, हे विधान फक्त

येथे केले आहे. मग त्यासाठी एक निबंध खर्ची घालायची काय जरुरी होती? 'मिळाली तर दया...' हा दीर्घ शीर्षकाचा निबंधही असाच.

कल्पनांची सुस्पष्टता, असंदिग्धता यांच्या अभावामुळेही या संग्रहातल्या लघु-निबंधांत परिणामाच्या दृष्टीने उणेपणा आला आहे. यामुळेच मग लेखनात शब्द-बंबाळपणा येतो. संग्रहाचे नाव धारण करणारा 'शतपावली' हा निबंध 'शब्दवेध', 'क्षितिजे दूर गवाक्षाची' हे निबंध ह्या दृष्टीने पहावे.

लघुनिबंधामध्ये एखादी प्रस्थापित कल्पना, विचार यांचे लेखक (नेमके त्याविरुद्ध असे किंवा) त्याला भावेल तसे 'इंटरप्रिटेशन' सहजतेने करू शकतो. अर्थात हा काही त्या लेखनाचा दोषास्पद वा टीकार्ह भाग होत नाही. लेखकाने ते कितपत 'कन्व्हिन्सिंग' केले आहे ते महत्त्वाचे. प्रस्तुत संग्रहातही असे निबंध आहेत. ('मा निषाद', 'अजिंठा आणि वारूळ', 'सद्गुणांचे व्यसन करणारा चारुदत्त') आणि ते थोडेफार यशस्वी झाले आहेत असे म्हणता येईल. थोडेफार अशासाठी म्हटले की ह्या निबंधाच्या लेखनातला प्रामाणिकपणा जाणवतो, त्यांच्या लघुनिबंधाचा बाजही इथे सांभाळला जातो आणि तरीही ते उपरोक्त दोषांपासून अलिप्त राहू शकत नाहीत. 'मा निषाद' मध्ये तर ह्या श्लोकार्धाचा दिलेला अर्थच चुकीचा आहे. 'तू या जगात यापुढे बिलकुल प्रतिष्ठित मानला जाणार नाहीस', हा त्याचा अर्थ. 'तू लवकरच मरशील' असा त्याचा मधुकरांनी लावलेला अर्थ ह्यात ध्वनितही होत नाही. प्रतिष्ठा कायमची गमावून बसशील म्हणजेच मेल्यासारखा होशील, असा यातून अर्थ काढता येईल, पण तो फारच ताणलेला होईल हे उघड आहे.

'माझी दिनचर्या', 'माझे पहिले व्याख्यान' हे लघुनिबंधही फसले आहेत. 'छळवादी' हा लघुनिबंधही यातच जमा करायला हरकत नाही.

'एक शहाणा, काही वेडे', 'मी आणि माझे व्यक्तिमत्त्व' हे मात्र ह्या संग्रहातले लक्षात राहणारे लघुनिबंध. आणि म्हणूनच असे वाटते की, मधुकरांचे सुरुवातीचे प्रयत्न असल्याने उपरोक्त उणीवा राहिल्या असाव्या. एरव्ही त्यांच्याकडून चांगल्या लघुनिबंधांची अपेक्षा करायला हरकत नाही.'

लेखकाला जे काही म्हणायचे आहे ते नेमकेपणाने संपूर्ण निबंधात एकरूप होत नाही. लघुनिबंधाचा बाज पकडून लेखक लिहायला सुरुवात करतो, पण सांगायचे ते शेवटी सरळ विचारांतच (बहुधा) अखेरच्या परिच्छेदांतून सांगून टाकतो. त्यामुळे लेखनाचा पसारा वाढतो व म्हणूनच साऱ्या लेखनाचा अंतिम ठसा अस्पष्ट उमटतो.

जाता जाता एका गोष्टीची नोंद : मौजेचे मुद्रण निर्दोष असते, असा समज निदान या पुस्तकापुरता तरी चुकीचा ठरला आहे. (उदा.: पृ. १०, २०, २९, ३८, ८१ इ.)

शतपावली : मधुकर : मौज प्रकाशन, मुंबई : मूल्य पाच रुपये




अॅडव्होकेट
माधव
कानिटकर

लेखांक
तीन

फिल्लापूर येथील प्रथम वर्ग दंडाधिकारी आणि दिवाणी न्यायाधीश यांचे कोर्ट. (Civil Judge and 1st class Judicial Magistrate's Court) कोर्टात गर्दी उसळली होती. लोकांना ठाऊक होतं की आज रूराला कोर्टात आणणार. रूराला अटक झाल्याची बातमी पेपरला वाचल्याबरोबर त्याच दिवशी सकाळी आजुबाजूच्या खेड्यातले लोक कोर्टाकडे धावत सुटले आणि कोर्टात जागा धरून बसले. त्यांना रूराला पाहायचा होता ! प्रेस फोटोग्राफर्स आपापले कॅमेरे साव-रीत मुकेरियन पोलीस स्टेशनवर हजर झाले. त्यांना रूराचा फोटो घ्यायचा होता आपापल्या वर्तमानपत्रात पहिल्या पानावर प्रसिद्ध करण्यासाठी ! डेप्युटी इन्सपेक्टर जनरल ऑफ पोलीस श्री. अश्विनकुमार यांना याचा अंदाज होता. ते मुकेरियन पोलीस स्टेशनच्या दरवाजा-तच उभे होते. त्यांनी प्रेस फोटोग्राफर्सना विनंती केली

की, 'तुम्ही उगीच कशाला थांबता? तुम्ही रूराचा फोटो घेऊ शकणार नाही. अजून त्याची ओळख–परेड व्हायचीय्. अगोदरच फोटो प्रसिद्ध झाला तर आम्हाला पुढे त्रास होईल. सॉरी! प्ली ऽऽ ज गो बॅक.'

...हे वातावरण बघून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची तातडीची सभा भरली. स्वतः इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस, स्टेट ऑफ पंजाब, यांनी चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटला फोन करून त्यांची खास परवानगी घेतली की, रूराला लंच टाईम मध्ये मॅजिस्ट्रेट साहेबांच्या चेंबरमध्ये हजर करायला आम्हाला परवानगी द्या. त्याला बुरखा घालून आम्ही दुपारी २ वा. मॅजिस्ट्रेट साहेबांसमोर हजर करू.

...इकडे कोर्टात लोक गडबड करीत होते. त्यांना कोर्टात शिरायला देखील जागा मिळाली नव्हती. त्यांनी कोर्टाच्या आवारात, कोर्टात जाण्याच्या मुख्य दरवाजाशी गर्दी केली. काही अति उत्साही लोक आजुबाजूच्या झाडांवर चढले. प्रेस फोटोग्राफर्स कॅमेरे लावून कोर्टाच्या मुख्य दरवाजाशी बसून राहिले. आता रूराला आणणार होते ना! ११ वाजले – ११॥–१२–१ लोकांची निराशा झाली. रूराला पोलीसांनी आणलाच नाही! लोक हळू हळू परतू लागले. दुपारी १॥ वाजता एक पोलीस व्हॅन कोर्टाच्या मागच्या बाजूला येऊन उभी राहिली. हातात हातकड्या, दंडाला काढण्या, चेहऱ्यावर काळा बुरखा, आणि गळ्यापासून पाया-पर्यंत गुंडाळलेलं पांढरं कापड अशा अवस्थेत मागच्या दरवाजाने कडक पोलीस बंदोबस्तात रूरा मॅजिस्ट्रेट साहेबांच्या चेंबरमध्ये नेला–गेला. सब-इन्स्पेक्टर शिव-प्रसादनी मॅजिस्ट्रेट साहेबांना कडक सलाम ठोकला. पोलीस प्रॉसिक्युटरने जामिनाला हरकत घेण्याचे भाषण सुरू केले. पण त्याची जरूर नव्हती. मॅजिस्ट्रेट साहेबसुद्धा वर्तमानपत्र वाचत होतेच की. मॅजिस्ट्रेट साहेबांनी हात वर करून सरकारी वकिलांना थांबवले आणि सब-इन्स्पेक्टर शिवप्रसादना हुकूम दिला की, 'आरोपीचा बुरखा काढा!' कॉन्स्टेबलस तातडीने पुढे धावले. त्यांनी रूराचा चेहरा उघडा केला. मॅजिस्ट्रेट साहेबांनी आरोपीला विचारले, 'क्या नाम है तुम्हारा?'

'रूरासिंग.... साहब!'

मॅजिस्ट्रेट साहेबांनी खाली मान घालून बराच वेळ काहीतरी लिहिले आणि हुकूम दिला की, 'अधिक चौकशीसाठी रूराला १४ दिवस पोलीस कस्टडी!'

रूराच्या तोंडावर पुन्हा बुरखा घालण्यात आला. आणि रूरा मुकेरियन पोलीस कस्टडीत बंद झाला! त्याच कस्टडीत की जिच्यात त्याने पोलीस कॉन्स्टेबलसनाच बंद केले होते.

...रात्री ११–११॥ लाच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी रूराला इन्क्वायरी रूममध्ये घेतला. आत नेल्याबरोबर एका अधिकाऱ्याने त्याचा फेटा सोडला. त्याचे केस हातात धरून त्याचे डोके दाणकन् भिंतीवर आपटले. रूराच्या डोळ्यासमोर

काजवे चमकले. धडपडत तो सरळ उभा रहात ओरडला, 'साहेब! मला मारू नका, मी बेगुन्हा आहे!' दुसऱ्या अधिकाऱ्याने त्याच्या फटाफट कानफटात मारल्या आणि जोरात विचारले,

'बोल लवकर बोल. तुझ्याबरोबर आणखी कोण कोण होते? उगाच नाटकं करू नकोस. आणखी मार खाशील!'

आणि रूरा बोलू लागला, 'साहेब! माझ्याबरोबर मोहनसिंग, चरणसिंग आणि जगजितसिंग होते.'

'आता कुठे आहेत ते?'

'अमृतसरला!'

'कुणाच्या जिवावर एवढी हिंमत केलीत तुम्ही?'

'जगजितसिंगच्या!'

'काय करतो हा जगजितसिंग?'

'पंजाबच्या मुख्यमंत्र्यांचा पुतण्या आहे तो!'

'कोणाचा? मुख्यमंत्र्यांचा? सरदार प्रतापसिंग कैरोंचा?'

'होय साहेब!'

...रूराच्या आणखी ५–६ कानफटात बसल्या. पाठीमागे हात बांधून फेऱ्या घालीत डेप्युटी इन्स्पेक्टर ऑफ पोलीस अश्विनकुमार रूराला उपहासाने म्हणाले, 'रूरा! तू समजतोस तेवढे आम्ही बुद्दू नाही. तुम्ही चौघे नव्हतात तर आठजण होतात. बोल, बाकीचे चौघे कोण होते? रूरा उत्तर देईना. पोलीसांनी त्याला २–३ तास गुरासारखा बडवला. रूरा जमीनीवर गडबडा लोळत मार खात होता, ओरडत होता, रडत होता. शेवटी मार असह्य झाल्यावर तो कळवळला आणि ओरडून साहेबांचे पाय पकडून म्हणाला, 'साहेSSSSब! खरं सांगतो, मला त्यांची नावं माहिती नाहीत. आमच्या दोन पार्टर्या होत्या! जगजितसिंगाने त्या दिवशी आयत्यावेळी मला बोलावून घेतले म्हणून मी गेलो.'

त्याची 'अवस्था' पाहून आता (!) त्या पोलीस अधिकाऱ्यांनासुद्धा त्याची दया आली! त्याला बकोटीला धरून उभा करीत D. I. G. P. अश्विनकुमारनी त्याला विचारले, 'रूरा! लुटीच्या मालापैकी एक बंदूक तर तुझ्याकडे मिळालीच. आता बोल बाकीचा माल कुणाकडे आहे?'

'माझ्याकडे आहे तेवढा दाखवतो मी. पण मला मारू नका!'

...रूराचे अंग ठणकत होते, तो विव्हळत होता, रडत होता. त्याला चालायची ताकद नव्हती. दोन कॉन्स्टेबलसच्या खांद्यावर हात टाकून तो कसाबसा जीपमध्ये चढला आणि चुहारपूर व्हिलेजमधल्या आपल्या घराच्या मागे गवताच्या गंजीत दडवलेली हत्यारे – २ रिव्हॉल्व्हर्स, २ काडतूसं आणि सब-इन्स्पेक्टर शिवप्रसादांच्या बंदुकीचे लायसन्स त्याने पोलीसांना काढून दिले. रात्री १॥–२ वाजता वरिष्ठ अधिकाऱ्यांचा हुकूम सुटला,

'हवालदार! याला आतमध्ये बंद करा!'

...दुसऱ्या दिवशी सकाळी रूराची ओळख-परेड झाली. मॅजिस्ट्रेट साहेबांनी सुरुवातीलाच रूराला सांगितले, 'रूरा! तुझ्याच उंचीची आणि अंगलटीची एकूण आणखी आठ माणसं इथे उभी आहेत. सगळ्यांनी एका ओळीत उभे रहा. तू कुठेही उभा राहू शकतोस.'

असे एकूण ९ 'रूरा' एका ओळीत उभे राहिले. मॅजिस्टेट साहेबांनी स्वतः जेलचा मुख्य दरवाजा किलकिला केला आणि बाहेर उभे असलेल्या पोलीसांना ते म्हणाले, 'आता येऊ द्यात तुमचे साक्षीदार.'

... आणि अहो आश्चर्यम्! पोलीसांतर्फे पाठवण्यात आलेल्या आठ पैकी सात साक्षीदारांनी रूराला अचूक ओळखला. मॅजिस्ट्रेट साहेबांनी घडलेल्या प्रकाराचा रिपोर्ट लिहिला. रूरा आतमध्ये बंद झाला.

... आता पोलीसांना वेळ नव्हता. लगेच सकाळी १४० कॉन्स्टेबल्स आणि ६ सब-इन्स्पेक्टर्सची पार्टी अमृतसरच्या दिशेने जाण्यासाठी तयार ठेवण्यात आली. पण या पोलीस-पार्टीची चुळबूळ सुरू झाली. डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस अश्विनकुमार संतापले! हा काय चावटपणा? माझी ऑर्डर असताना अजून तुम्ही इथेच घुटमळता? शेवटी त्यातल्या एक-दोन धीट सब-इन्स्पेक्टर्सनी सलाम ठोकून D. I. G. P. ना हळूच विचारलं, 'सर! जगजितसिंगला पकडायचा? पंजाबचे मुख्यमंत्री प्रतापसिंग कैरों यांचा पुतण्या आहे तो! उद्या कुठे कळ फिरली तर आमच्या नोकऱ्या जायच्या! अब्रू जायची! या राज्यात पोलीस खात्यात नोकरी करणं म्हणजे पाप आहे!'

D. I. G. P. अश्विनकुमारांचा पारा आणखीन चढला! रागारागाने डोळे गरगरा फिरवीत ते ओरडले, 'जाऽऽव! माझी ऑर्डर आहे ती. मुख्यमंत्र्यांचा पुतण्या असला म्हणून काय झालं? मी आहे तुमच्या पाठीशी. ॲरेस्ट हिम इमिजिएटली.'

... सगळे कॉन्स्टेबल्स आणि सब-इन्स्पेक्टर्स भराभर व्हॅनमध्ये चढले आणि पोलीस व्हॅन अमृतसरच्या दिशेने धावू लागली...

... पोलीसांजवळ 'खबरी' असतात तसे गुन्हेगारांजवळ सुद्धा असतात. पोलीसांच्या हालचाली त्यांना अचूक कळतात.

अमृतसरजवळच्याच एका खेड्यात मोहनसिंग आणि चरणसिंग या दोन दरोडेखोरांनी धावत्या पोलीस व्हॅनवर तुफानी गोळीबार सुरू केला. त्यांचा अंदाज चुकला. त्यांना वाटलं होतं व्हॅनमध्ये फार फार तर १-२ सब-इन्स्पेक्टर्स आणि १०-१२ हवालदार असतील. पण पोलीस व्हॅन थांबली! ५-६ सब-इन्स्पेक्टर्स शिताफीने उड्या मारून वेगवेगळ्या दिशेने गोळ्या चुकवीत पळाले. अजून दरोडेखोर गोळीबार करीतच होते. आता हवालदारसुद्धा मैदानात उतरले. दोन्हीकडून

गोळागोळी चालूच होती. दरोडेखोर आता मात्र गांगरले. चारी दिशांनी त्यांच्या-वर गोळ्यांचा मारा होत होता. आणि हाय ! कुठल्यातरी दुर्दैवी (की सुदैवी ?) क्षणी दोन्ही दरोडेखोरांच्या अंगात पोलिसांच्या गोळ्या घुसल्या. रक्ताच्या थारोळ्यात ते थोडावेळ तडफडले आणि जागच्या जागी ठार झाले.

मोठी शिकार केल्याच्या आनंदात पोलिसांनी त्यांची प्रेतं पोलीस व्हॅनमध्ये टाकली आणि व्हॅन परत आली. प्रेतांचा पंचनामा झाला. प्रेतांचे फोटो घेतले गेले. त्यांची ओळख–परेड मात्र झाली नाही. प्रेतांची कसली घ्यायची ओळख–परेड ? पोलिसांनी एक मात्र केलं. दोन्ही प्रेतांच्या हातांच्या बोटांची चामडी ब्लेडने काळजीपूर्वक सोलून काढली आणि २० वेगवेगळ्या स्पिरीटच्या बाटल्यात टाकून दिली. फिंगरप्रिंट एक्सपर्टने या सोललेल्या कातडीचे ठसे घेतले. मोहनसिंगच्या हाताच्या बोटाच्या कातडीचे ठसे पंजाब नॅशनल बँकेतल्या स्टील कॅबिनेटवर मिळालेल्या ठशांशी तंतोतंत जुळले. तर चरणसिंगच्या बोटांच्या कातडीचे ठसे बसच्या काचेच्या खिडकीवर मिळालेल्या ठशांशी जुळले.

दुसऱ्या दिवशी सकाळी पोलीस व्हॅन पुन्हा एकदा अमृतसरला निघाली. जगजितसिंगला अटक करायला पोलिसांना फार त्रास पडला नाही. मुख्यमंत्री सरदार प्रतापसिंग कैरों यांचा पुतण्या होता ना तो ! आपल्या घरीच आरामशीर बसला होता. आपल्याला अटक करायची हिंमत पंजाब पोलीस करतील याची त्याला स्वप्नात सुद्धा कल्पना नव्हती. दरवाजाची घंटा वाजली म्हणून त्याने स्वतःच येऊन दरवाजा उघडला. बघतो तो काय ! बाहेर पोलिसांचा ताफा ! प्रत्येक सब-इन्स्पेक्टरने रिव्हाल्व्हर रोखलेले. 'पाहू या काय होतं ते, काका आहेतच वाचवायला !' असा विचार करून तो काहीही खळखळ न करता पोलीसांच्या स्वाधीन झाला. एका सब–इन्स्पेक्टरने पुढे होऊन त्याची झडती घेतली. त्याच्या घराची झडती घेतली गेली. त्यात एक बंदूक मिळाली. याच बंदुकीने हेडकॉन्स्टेबल निर्भयसिंग मारला गेला होता !

त्याच दिवशी संध्याकाळी जगजितसिंगाची ओळख–परेड झाली आणि आठापैकी आठही साक्षीदारांनी त्याला बिनचूक ओळखला.

जगजितसिंगाच्या संपूर्ण पंजाचा ठसा बसच्या मडगार्डवर मिळालेल्या पंजाशी (Human Palm) सही सही जुळला.

एकूण ८ पैकी २ दरोडेखोर मारले गेले. २ पकडले गेले. अजून ४ बाकी होते. पंजाब पोलीस पुन्हा एकदा अडचणीत आले. 'त्या' चौघांची नावं रूराला ठाऊक नव्हती. तशीच ती जगजितसिंगला पण ठाऊक नव्हती. त्याला पोलिसांनी मरे मरेस्तोवर धोपटला तरी त्याचे आपले एकच पालुपद चालू, 'त्यांची नावं मला ठाऊक नाहीत साहेब ! माझा या दरोड्याशी काही संबंधच नाही.' आता मारून मारून मारायचा तरी किती ? काय ठार थोडाच मारायचाय ? पंजाब पोलिसांनी



**जगतसिंगने दरवाजा उघडला. पाहतो तो प्रत्येक इन्स्पेक्टरने रिव्हॉल्व्हर रोखलेले...**

त्याला बंद करून ठेवला आणि ते पुन्हा एकदा विचारात पडले आता पुढे काय ?

... अशा स्थितीत आणखी एक पंधरवडा गेला. लोकलमध्ये, बसमध्ये, हॉटेलात, सरकारी ऑफीसेसमध्ये लोक उघड उघड बोलू लागले, ‘ अरे मी सांगतो तुला, ही केस पंजाब पोलीस दडपून टाकणार. मुख्यमंत्र्यांचा पुतण्या आहे ना त्यांच्यात. तो सरदार प्रतापसिंग कैरॉं आहे ना बसलेला वर ! च्यायला आपण असलं काही केलं असतं तर एव्हाना फाशी गेलो पण असतो ! हे काय राज्य आहे ? पंजाब सोडून दुसरीकडे कुठे तरी गेलेलं बरं. ’

... तशातच पंजाबमधली ‘ दि ट्रिब्यून, ’ ‘ दि डेली मिलाप ’ यासारखी प्रमुख वर्तमानपत्रे पोलीस खात्यावर तुटून पडली. संपादक त्यांचे कर्तव्य बजावीत होते. पंजाब विधानसभेत खळबळ माजली. विरोधी पक्षांनी मुख्यमंत्र्यांकडे निवेदन

सांगितले. मुख्यमंत्र्यांनी ठराविक उत्तर दिले, 'प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मी आता या प्रकरणात काही सांगू इच्छित नाही!''

... पंजाब पोलिसांची पंचाईत झाली. डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीसने सर्व पोलीस स्टेशन्सना कडक हुकूम दिला, 'काय चाललय काय हे? पोलीस आहात का हजाम! पुढच्या ४८ तासात बाकीचे गुन्हेगार पकडले गेलेच पाहिजेत.'

सब–इन्स्पेक्टर शिवप्रसादांनी आता पुन्हा एकदा चंग बांधला. पूर्वी न पकडलेल्या सर्व दाखलेबाज गुंडांवर व ज्यांचं चारित्र्य संशयास्पद आहे अशा लोकांवर सक्त नजर ठेवण्यासाठी त्यांनी कॉन्स्टेबल्स पाठवले. असाच एक दाखलेबाज भर बाजारातून खरेदी करत चालला होता. हवालदार त्याच्या मागे होताच. या संशयीत 'इसमा'चं पोट थोडं पुढे आलेलं होतं. हवालदाराला संशय आला. त्याने त्या 'इसमाला' थांबवून विचारलं,

'क्या नाम है तुम्हारा?'

'ग्यानसिंग!'

हवालदाराने खस्सकन त्याचे कपडे वर केले आणि आतून एक पिस्तूल बाहेर पडलं!

हवालदाराने त्याला तसाच पोलीस स्टेशनवर आणला. ग्यानसिंगकडे पिस्तुलाचं लायसन्स नव्हतं.

रात्री ग्यानसिंगाची जाम धुलाई झाली. ग्यानसिंगाने नाटक सुरू केले. रडत ओरडत तो म्हणाला, 'क्यौ मारते हो साहब गरीबको (!) खालीपिली? मैंने कुछ नही किया!'

...आता मात्र पोलिसांनी चालबाजी सुरू केली. त्यांनी मुद्दामच ग्यानसिंगला विचारलं, 'रूरा और जगजितसिंग को जानते हो? ठीक ठीक जबाब देना नही तो और मार पडेगा!'

'हां साब, जानता हूँ!'

'कैसे जानते हो?'

'रूरा और मैं साथमें जेल काटते थे. जेल छुटनेके बाद जगजितसिंग की पहचान रूराने कर दी!'

'अच्छा? १ एप्रिल १९५७ ला रात्री ८ वाजल्यापासून तो २ एप्रिलच्या सकाळपर्यंत तू कुठे होतास?'

'आता जुनी गोष्ट झाली साहेब ती! आता एकदम कसं आठवणार? प्रत्येक दिवशी मी काय डायरी ठेवतो?'

'अस्स! बरं सांग तुला सजा कशाबद्दल झाली होती?'

'दरोडा घातल्याबद्दल!'

'आणि रूराला?'

'माझ्याबरोबरच...!'

'इथे काय म्हणे पंजाब नॅशनल बँकेवर दरोडा पडला. आमच्या हेडकॉन्स्टेबलचा मर्डर झाला ?'

'आपल्याला काय माहिती साहेब ?'

'बरं रूरा सध्या कुठे आहे ?'

'मला ठाऊक नाही. मला भेटला नाही पुष्कळ दिवसात !'

'अच्छा ? म्हणजे तुला भेटायचा तर तो ! तुला म्हणून सांगतो रुरा गेले २०–२५ दिवस आमच्या ताब्यात आहे !'

ग्यानसिंगचा चेहरा पांढरा फटक पडला. हातातला दंडुका उजव्या हाताच्या मुठीत धरून डाव्या हाताच्या पंजावर आपटीत डेप्युटी इन्स्पेक्टर ऑफ पोलिसने हवालदाराला खूण केली, 'हवालदार...!'

हवालदार पुढे झाला. त्याने ग्यानसिंगच्या पेकाटात एक बुटाची लाथ हाणली. ग्यानसिंग धडपडत भिंतीवर जाऊन आपटला आणि त्याला सगळं काही एकदम आठवलं ! वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पायांवर डोकं आपटीत तो ओरडला, 'साहेब ! साहेब ! मी सगळं खरं सांगतो पण मला मारू नका !'

D. I. G. P. नी त्याचं बकोटं धरून त्याला उभा केला. त्याच्या एक कानफटात मारली आणि त्याला विचारलं, 'मग बोल लवकर ! कोण कोण होते या दरोड्यात ?'

...आणि ग्यानसिंग बोलू लागला !

'मी होतो ! जगजितसिंग, रूरा, चरणसिंग, मोहनसिंग, सुरिंदरसिंग, मुला आणि फकीरा !'

'तुझ्याकडे आत्ता किती माल आहे ?'

'मी दाखवतो, पण मला मारू नका !'

...तावडतोब ग्यानसिंगला जीप व्हॅनमध्ये बसवला गेला, आणि त्याच्या शेतात एक शॉट गन आणि काडतुसं मिळाली. ग्यानसिंगाला रात्री पुन्हा ठोकला. तेव्हा त्याने सुरिंदरसिंग, मुला आणि फकीरा यांचा पत्ता दिला.

...दुसऱ्या दिवशी ग्यानसिंगची ओळख-परेड झाली. ८ पैकी ७ साथीदारांनी त्याला बरोबर ओळखला.

...३ मे १९५७ ! पोलीस पार्टी अमृतसर नजिकच्या एका खेड्यात घुसली. ग्यानसिंगने सुरिंदरसिंगचा पत्ता दिला होता. पोलिसांनी दारावर थाप मारली. आतून उत्तर नाही ! D. I. G. P. अश्विनकुमार जोरात ओरडले, 'सुरिंदरसिंग ! आम्ही पोलीस आहोत. मुकाट्याने बाहेर ये !'

...आतून एक बंदुकीची गोळी सणाणत बाहेर आली. नशीब ! D. I. G. P. वाचला ! पोलीस पार्टी मागे हटली ! ...आणि D. I. G. P. ने हवालदारांना हुकूम दिला, 'थोडा वेळ स्वस्थ बसा ! तो बाहेर येतो का बघू. नाहीतर तुम्ही

कौलांवर चढा आणि एक कौल काढून आत टीअर गॅस टाका. कसा बाहेर येत नाही बघू!'

...थोडा वेळ गेला. दोन चतुर हवालदार त्या घराच्या छपरावर आवाज न करता चढले. अचानक एक कौल काढून त्यांनी टीअर गॅसचा बल्ब वरून खाली आपटला. असाच आणखी थोडा वेळ गेला! आणि अचानक गोळीबार करीत बेफाम झालेला सुरिंदरसिंग बाहेर पडला. पोलिसांनी उलट गोळीबार केला आणि त्यातलीच एक गोळी सुरिंदरसिंगला लागली! ज्या घरात त्याने आश्रय घेतला होता, त्या घरासमोरच तो मरून पडला! त्याच्या हातातील बंदूक पोलिसांनी काढून घेतली. ती बंदूक मुकेरियन पोलीस स्टेशनची होती!

...आता राहिले होते फक्त मुला आणि फकीरा. शहाण्या माणसाने उगाच कुणाशी भांडण वाढवू नये म्हणतात ते खोटं नाही! याच मुला आणि फकीरानी हरभजनसिंग नावाच्या एका माणसाशी उगाच दादागिरी केली होती. हरभजनसिंग त्यावेळीं गप्प बसला. पण आता मात्र त्याला वाचा फुटली. तो सरळ पोलीस स्टेशन-वर गेला आणि त्याने पोलिसांना खबर दिली की, 'साहेब! ग्यानसिंग खोटं बोलत नाही! त्याने तुम्हाला बरोब्बर पत्ता दिला होता. पण आता मुला आणि फकीरा यांनी त्यांची जागा बदलली. ते हल्ली होशियारपूर डिस्ट्रीक्टमध्ये असतात.' लगोलग पोलीस पार्टी निघाली. अखेर पुन्नपूर या खेड्यात ते दोघं रहातात अशी खबर मिळाली. पोलिसांना आणखी खबर मिळाली की मुला ७ ऑगस्टला एकटाच बसने बाहेरगावी जाणार आहे. पोलिसांनी जाळं टाकलं. पहाटे ५।। वाजता आपलं सामान घेऊन मुला बसस्टॉपवर आला! पोलिसांनी एकमेकांना डोळा मारला आणि बससाठी उभे असलेल्या त्या 'पॅसेंजर्स'नी मुलाला अटक केली! त्याच्याकडे २ किलो बटाटे आणि त्याच्या खाली एक रिव्हॉल्व्हर मिळाले. हे रिव्हॉल्व्हर सब-इन्स्पेक्टर शिवप्रसाद यांचं होतं!

मुलाला ताब्यात घेतल्यानंतर पंजाब पोलिसांनी एक अफलातून शक्कल काढली. ८ दरोडेखोरांपैकी ३ पोलिसांनी ठार केले होते. ४ पकडले होते. एक अजून हातात यायचा होता. तो पण पोलिसांकडून मारला गेला तर? त्यांनी हरभजनसिंगला विचारलं, 'फकीराला काही व्यसन वगैरे...?'

'हे काय विचारणं झालं साहेब? त्याला दर अर्ध्या तासांनी कंट्री लागते?'

D. I. G. P. आणि हरभजनसिंग एकमेकांशी हलक्या आवाजात काय बोलले कुणास ठाऊक? पण हरभजनसिंग पुढे आणि पोलीस पार्टी मागे अशी वरात निघाली. पोलीस पार्टी जरा लांब उभी राहली. हरभजनसिंग एकटाच पुढे गेला. फकीरा आणि त्याचा एक सहकारी (!) झोपडीत दारू पीत बसले होते. हरभजन-सिंग पुढे झाला. फकीराने त्याला पाहून बंदूक उचलली! हरभजनसिंगाने एकदम नाटक सुरू केले,

'नमस्ते! नमस्ते! आपल्यात काहीही भांडण असो. पण यार! आपण दोघेही पिणारे! तुला कळलं? मुलाला पोलिसांनी पकडला!'

'काय सांगतोस? अरे! आज पहाटेच तो बसनी बाहेरगावी गेला!'

'...जाणार होता! त्याला बस स्टॉपवरच पकडला!'

'सत्याऽऽनाऽश! आता माझंपण नाव पोलिसांना कळणार! इथून गेलेले बरं!'

'जाऊ या रेऽऽ! जरा थोडी थोडी घेऊ या!'

हरभजनसिगनें खिशातून नोटा काढल्या आणि फकीराच्या सहकाऱ्याला–ज्याचं नाव होतं बिशनसिग–तो म्हणाला, 'एऽऽ! २ सोडा और १ बाटली प्युअर का लाव!'

बिशनसिग बाहेर पडला आणि अलगद पोलिसांच्या हातात सापडला!

...बराच वेळ झाला. बिशनसिग दारू घेऊन आला नाही, तसा फकीरा चिडला. हरभजनसिगावर बंदूक रोखून त्याने विचारले,

'तुला काय वाटलं? मजा चढली? धोकेबाज. तुला ठारच मारला पाहिजे!'

घाबरून हरभजनसिगाने फकीरावर झडप घातली. बंदुकीची नळी त्या झटापटीत वर गेली आणि आवाज झाला, 'ठोऽऽऽ!' फकीराने पुन्हा हरभजनसिगावर बंदूक रोखली. स्वतःच्या प्राणावर बेतलं म्हणजे माणूस बेफाम होतो. हरभजनसिगाने पुन्हा फकीराशी झटापट करून त्याची बंदूक हिसकावून घेतली आणि रागाच्या भरात स्वसंरक्षणार्थ त्याने फकीराला गोळी घातली. पोलीस पार्टी आत येईपर्यंत फकीरा खतम झाला होता.

...डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिसने कपाळाला हात लावला. हरभजनसिगाकडे पहात ते म्हणाले,

'काय केलंस हे? जे होऊ नये म्हणून तुला पुढे पाठवला तेच तू केलंस! आता माझा नाईलाज आहे! हवालदार! याला पण ताब्यात घ्या!'

...एकूण ८ दरोडेखोरांपैकी ४ जिवंत पकडले गेले. ३ पोलिसांनी ठार मारले आणि एक हरभजनसिगाने!

पोलिसांचं काम आता संपलं होतं. आंधळी न्यायदेवता आता न्याय देणार होती.

(क्रमशः)

# रंगभूमि

साहित्य संघाचे नवे नाटक

## घेतलं शिंगावर

श्री. मनोहर काटदरे या नवीन लेखकाचे ' घेतलं शिंगावर ' हे पहिले नाटक मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाट्यशाखेने नुकतेच सादर केले. घटनांच्या रचनेवर आधारलेल्या या विनोदी नाटकाचे दिग्दर्शन श्री. दामू केंकरे यांनी केले आहे.

एक सुखी जोडपे (सौ. सुलभा देशपांडे व श्री. नारायण पै.) सोमवार ते शनिवार दुपार शहरामधील आपल्या सुसज्ज जागेत राहाते आणि शनिवार–रविवार बोरीवलीला जात असते. एका शनिवारी दुपारी काहीतरी वेगळे करावे म्हणून सरिता (सौ. देशपांडे) एकटीच घरात रहाते आणि ' सज्जन ' किल्लीने दार उघडून घरात येतो. हा कोणी चोर नसून एक विद्यार्थी आहे. तो दर शनवार–रविवार सरिताच्या शहरातील जागेत आणि आठवडाभर बोरीवलीच्या जागेत राहात असतो आणि आज तर त्याने आपल्या प्रेयसीला बोलावलेले असते–इथून एका प्रचंड घोटाळ्याला सुरुवात होते. या नाटकाच्या कथानकातील वरील मूळ कारण नवे असले तरी फसवाफसवीच्या मामल्यातून निर्माण होणारे संशयकल्लोळ मराठी वाचकाला नवे नाहीत. परंतु श्री. काटदरे यांनी या नाटकातील प्रसंगांची रचना, संवादांची रचना अशी केली आहे की त्यामुळे एक नवे प्रसन्न नाटक पाहिल्याचा आनंद प्रेक्षकाला होतो नाटकाच्या प्रारंभी येणारे पति–पत्नीचे निरर्थक भांडण, सज्जनला चोर समजणे, घरातील नवचित्राचा अर्थ व जागा, सरिताच्या पतीची बॅग इत्यादी तपशीलांचा नाटककाराने संवादातील विनोदनिर्मितीबरोबरच नाट्यपूर्णतेसाठी केलेला उपयोग, या नव्या नाटककाराची नाट्यमाध्यमाची समजच व्यक्त करतो.

सज्जनच्या प्रेयसीचे (कु. मीना सुखटणकर) वडील ( श्री. विनायक जोशी ), श्री. झुआर यांचा पार्शी अधिकारी (श्री. राघवेंद्र चौहान), सॅनिटरी इन्स्पेक्टर (श्री. रमाकांत देशपांडे), सरिताची उच्चभ्रू मैत्रीण ( सौ. केंकरे ) या अनाहूत पाहुण्यांच्या येण्यामुळे या नाटकात विलक्षण रंगत आली आहे. वर उल्लेखिलेल्या या व्यक्तिरेखा विडंबनात्मक असल्या तरी हे विडंबन भडक नसल्यामुळे त्यांच्यातील व्यक्तित्व जिवंत राहिले आहे. सज्जन आणि त्याची प्रेयसी यांची कृतक प्रेमभाषणे नाटकाच्या विनोदी रचनेला मोठीच साहाय्यक ठरली आहेत.

श्री. अविनाश मसुरेकर (सज्जन) आणि सौ. सुलभा देशपांडे व श्री. नारायण

पै (श्री. व सौ. झुंजार) यांनी या नाटकाला साजेसा मनमोकळ्या शैलीचा अभिनय केला. नेहमी गंभीर भूमिका करणाऱ्या सौ. सुलभा देशपांडे यांचा या नाटकातील अभिनय पाहाताना त्यांच्या अभिनयकौशल्याचा खरा प्रत्यय आला. नाही तर अलीकडे त्यांच्या अभिनयाचा एकच साचा होत आहे की काय, असे भय वाटू लागले होते. कु. मीना सुखटणकर यांना मात्र या नाटकात आपले 'बेअरिंग' नेमके सापडत नव्हते, असे जरा वाटले. श्री. रमाकांत देशपांडे यांनी 'ससा आणि कासव', 'मना सज्जना' या नाटकाप्रमाणे आपल्या विडंबनानुकूल शरीरयष्टीचा इथेही चाणाक्ष उपयोग केला आहे. खरे म्हणजे या नटाला अधिक वाव मिळाल्यास तो विशेष कौशल्य प्रगट करील असे नेहमी वाटते.

श्री. दामू केंकरे यांनी या विनोदी नाटकाचे दिग्दर्शन करताना राखलेला संयम कौतुकास्पद आहे. फार्सचे दिग्दर्शन करताना आखीव रचनाकृती निर्माण करणाऱ्या हालचाली पात्रांना देण्याचा साहजिक मोह टाळून, त्यांनी पात्रांच्या हातापायांच्या मोकळ्या हालचालींनी फार्सिकल परिणाम साधला आहे. श्री. केंकरे यांनी उमेदवारीच्या काळात सादर केलेल्या 'वेड्यांचा चौकोन' याच नाटकाच्या जातीचे हे नवे नाटक त्यांनी अधिक जाणकारीने बसविले आहे.

बऱ्याच दिवसांनी साहित्य संघाला एक चांगले नाटक लाभले आहे. श्री. काटदरे यांनी या पहिल्याच नाटकात आपल्याविषयी विशेष अपेक्षा निर्माण केल्या आहेत. एकाच महिन्यात मराठी रंगभूमीवर 'सखी शेजारिणी' व त्यापेक्षा सरस असणारे 'घेतलं शिंगावर' ही दोन निर्भेर विनोदी नाटके येणे हा एक सुखद योगायोग आहे.

— सौ. पुष्पा भावे

---

केवळ संख्यात्मक विचार करायचा तर भारतीय चित्रपट-व्यवसायाची सध्या चलती आहे असेच म्हटले पाहिजे. १९६७ साली ३३३ चित्रपट तयार करण्यात आले. १९६८ साली ही संख्या ३५० वर गेली. तर गेल्या वर्षी ३६७ चित्रपट तयार करण्यात आले. अनेक भाषांमध्ये तयार केलेल्या या चित्रपटांपैकी ५० टक्के चित्रपटही यशस्वी होऊ शकले नाहीत. सुमारे वीस टक्के चित्रपटांचा निर्मिती खर्च वसूल झाला. तर लक्षात रहाण्यासारखे यश केवळ सात चित्रपटांना मिळाले! मात्र असे असूनही शेकडो चित्रपट तयार करणारी ही यंत्रणा मजबूत उभी आहे. आज सुमारे ४५० चित्रपट निर्मितीच्या विविध अवस्थेत आहेत.

—एस्.

---

चित्रपट

शरद गोखले

## वारणेचा वाघ

नवदीप चित्र या संस्थेचा पहिला चित्रपट 'वारणेचा वाघ' हा त्याच्या वेगळ्या विषयामुळे, आणि विशेषत: पहिल्या भागातील उत्कृष्ट छायाचित्रणामुळे लक्षात राहतो. स्वातंत्र्यवेदीवर ज्या अनेकांनी बलिदान केले – अशांपैकी सत्तू भोसले हा एक. या सत्तू भोसल्याचे जीवित चित्रित करण्याचा प्रयत्न 'वारणेचा वाघ' या चित्रपटामध्ये करण्यात आला आहे.

वारणानदीच्या खोऱ्यात कुमज या आडगावी शौर्याची पूर्वपरंपरा असलेल्या भोसले घराण्यात सत्तूचा जन्म झाला आहे. वयात आलं की सैन्यात दाखल व्हायचं हा परिपाठ सत्तूही कायम ठेवतो. इमाने-इतबारे सैन्यात दाखल झालेला सत्तू नेमबाजी-मध्ये चांगला यशस्वी होतो. या नेमबाजीच्या कौशल्यामुळे एका लष्करी अधिकाऱ्याची तरुण मुलगी सत्तूवर मोहित होते. या तरुण मेरीसंबंधी ज्याच्या मनात 'खास ओलावा' आहे असा अधिकारी संधी साधून सत्तूला बेदम मारतो. रागाच्या भरात सत्तू लष्करातून पळून येतो. परक्याची सेवा खरी नाही असे त्याचे मत होते. गुंग्या लोहाराच्या मदतीने सत्तू एका दरोडेखोरांच्या टोळीत दाखल होतो. केवळ पोट जाळण्यासाठी दरोडेखोरी करणाऱ्या या मंडळींना सत्तू एक वेगळीच दृष्टी देतो. 'अयोग्य मार्गातून संपत्ती गोळा केलेल्या धनिकाचे निर्दलन, आणि गोर-गरिबांना सहाय्य करीत ब्रिटिश सत्तेशी यथाशक्ती झुंज घेण्याचे कार्यही सत्तूच्या नेतृत्वाखाली सुरू होते.

सैन्यातून सुटल्याबरोबर सत्तू एका अश्राप गर्भवती महारणीची पाटलाच्या तडाख्यातून सुटका करतो. ही महारीण सई सत्तूच्या घरी आश्रयाला येते. तिचा मुलगा राजा आपल्या मावशीकडे लहानाचा मोठा होतो. धर्मांतर करतो आणि डॅनीअल बनून फौजदाराच्या वेषात सत्तू समोर उभा राहतो. मानलेल्या बहिणीच्या मुलाविरुद्ध सत्तू उभा राहू शकत नाही. आणि अखेरीस एका धुमश्चक्रीमध्ये गोळी लागून त्याचा अंत होतो.

स्वातंत्र्यवेदीवर सर्वस्वाचे बलिदान करणाऱ्या स्वातंत्र्ययोद्ध्याची कथा म्हणून या चित्रपटाकडे पाहिल्यास निराशा पदरी येते. कारण स्वातंत्र्ययोद्धा म्हणून सत्तू भोसला कोठेही उभाच राहत नाही. तो मिलिटरी सोडतो, तो वैयक्तिक अपमाना-पोटी, पाटलापासून महारणीला वाचवतो ते कर्तव्याच्या भूमिकेतून, श्रीमंतांची

लुबाडणूक आणि गरिबांना सहाय्य, एवढ्या भांडवलावर त्याची स्वातंत्र्ययोद्धा म्हणून दखल घेणे शक्य होणार नाही. ही भूमिका बदलून कोणा एका सरळ मनाच्या आणि परिस्थितीने मार्ग बदललेल्या सत्तू भोसल्याची कथा म्हणून चित्रपटाकडे पाहिल्यास चित्रपट पुष्कळच समाधानकारक वाटतो. मानी मनाचा, सरळ स्वभावाचा सत्तू मार्ग बदलला तरी स्वतःचे सत्व सोडत नाही. गोरगरिबांच्या आयाबायांना बहिणी मानून त्यांना सहाय्य करावयास तो सदैव तयार आहे. जिला आपण बहीण मानले अशा सईचा मुलगा शत्रू म्हणून समोर आल्यावर याच्या मनाची घालमेल होते. समोर बंदूक घेऊन आलेल्या डॅनीअलला शत्रू मानण्यास तो तयारच नाही. हाती आल्यावरही डॅनीअलला जिवंत सोडण्याचा मोठेपणा त्याच्या ठिकाणी आहे. (क्रांतिमार्गी स्वातंत्र्ययोद्धयाकडून असे वर्तन होणार नाही) आणि या मोठेपणाची किंमत म्हणून स्वतःचे बलिदानही त्याला करावे लागले आहे.

चित्रपटाची पटकथा, संवाद, गीते जगदीश खेबुडकर यांची असून त्यांची कामगिरी पुष्कळच समाधानकारक आहे. विषय लक्षात घेता पटकथा जास्त गतिमान असणे आवश्यक होते. ही गती न लाभल्याने, मध्यंतरानंतरचा काही भाग कंटाळवाणा झाला आहे. संवाद ठीक आहेत. चित्रपटामध्ये गीतांना फारसा स्कोप नाही. 'बाई कसला हा कंबरपट्टा' हे तमाशा गीत आणि 'माझी वारणा माऊली' ही दोन गीते 'कॅची' आहेत. राम कदम यांनी चालीही चांगल्या बांधल्या आहेत.

वसंत पेंटर यांचे दिग्दर्शन चित्रपटाला लाभले आहे. हाती घेतलेल्या विषयाशी ते प्रामाणिक आहेत. चित्रपटाची लांबी आणखी थोडी कमी केली असती तर चित्रपट अधिक परिणामकारक झाला असता. टेकींग सेन्स असलेले जे थोडे दिग्दर्शक आहेत त्यामध्ये वसंतरावांचा समावेश करावा लागेल. बाह्य चित्रीकरणाचा लाभ त्यांनी भरपूर उठवला असून अनेक सुंदर शॉटस् दिले आहेत. या कामी छाया दिग्दर्शक वसंत शिंदे यांचाही आवर्जून उल्लेख केला पाहिजे. नृत्यांच्या छायाचित्रणातही पेंटर-शिंदे जोडीने चांगले कौशल्य दाखवले आहे. पेंटर यांनी विषय पुष्कळ समाधानकारकपणे हाताळला असला तरी चित्रपटामध्ये 'ब्रिटिश इंडिया' प्रस्थापित करण्याचा प्रयत्न 'चार ओळीच्या टायटल्स'चा अपवाद वगळता झालेला नाही. कथाही संपूर्णपणे सत्तू भोसले याची कथा झाली आहे.

कलाकारांपैकी सर्वात जास्त प्रभाव सत्तू भोसले याची भूमिका करणाऱ्या सूर्यकांत यांचा पडतो. त्यांना मानवेल अशी भूमिका पुष्कळ दिवसांनी त्यांच्या वाट्याला आली असून, त्याचा त्यांनी पुरेपूर फायदा घेतला आहे. त्यांचा हा सत्तू भोसला दीर्घकाळ लक्षात राहील. अन्य कलाकारात राजशेखर ठीक वाटतात. नवतारका सुशिला दिसते चांगली, परंतु भावदर्शन आणि संवाद बोलण्याचे सामर्थ्य यामध्ये ती तोकडी पडते. गंग्या लोहाराची भूमिका करणाऱ्या कलावंतानेही आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे. बारीक बारीक भूमिकांसाठी योजलेल्या

कलावंतांची निवड छान असून छोट्या भूमिका करणाऱ्या या सर्व कलावंतांनी उत्तम कामे करून चित्रपटाची रंगत वाढवली आहे.

वेगळ्या विषयावरील या चित्रपटाला प्रेक्षकांची दाद मिळणे कठीण असले तरी चाकोरीबाहेर जाण्याचे धाडस दाखवणाऱ्या नवदीप संस्थेचे अभिनंदन केले पाहिजे. □

हिंदी चित्र

# प्रिया

## चांगली कथा कल्पनेतच राहिली.

'प्रिया'चे सारे सौंदर्य कथाकल्पनेत आहे. पण दुर्दैव असे की चित्रपटात तिचा यथायोग्य विकास झाला नसल्याने, ती आपल्याला समजावून घ्यावी लागते. आपल्या विरोधी उठलेल्या परिस्थितीला वैतागून जाऊन घराबाहेर पडलेल्या एका स्वतंत्र, बंडखोर वृत्तीच्या कॉलेज तरुणीची ही कथा आहे. एकदा घराबाहेरच पडल्यावर तिच्यावर नाना तऱ्हेच्या आपत्ती येतात. एक ट्रकड्रायव्हर तिची छेड काढायचा प्रयत्न करतो, तेव्हा ती गावाबाहेर साईटवर काम करणाऱ्या एका इंजिनियरचा आसरा घेते. हा इंजिनियर तसा भल्या मनाचा. पण एका दुबळ्या क्षणी तो तिच्यावर बलात्कार करतो आणि आपल्याच कृत्याने पस्तावून जाऊन आत्महत्या करतो. प्रिया मुंबईला येते. ती मॉडेल बनते, सिनेमा नटी बनण्याचा प्रयत्न करते. पण ठिकठिकाणी तिला हाच अनुभव येतो की तिला एकटीला भोवतालच्या परिस्थितीचे ओझे उचलणे शक्य नाही. ती हतबल होते व आपल्या गावातील आपल्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या एका सायकलवाल्याशी लग्न करते.

ही कथा नेहमीच्या हिंदी चित्रपटात आढळते त्यापेक्षा अगदी वेगळी म्हणूनच मनाला भावणारी. पण कथेचे लेखन अतिशय कच्चे आहे. त्यामुळे 'प्रिया'ची निश्चित, सुसंगत अशी व्यक्तिरेखा उभीच रहात नाही. तिच्या वर्णनात दिसते ती परस्पर विसंगती. यामुळे ती आहे कशी ? हे नीटसे कधी समजत नाही. कधी कोणी म्हणतं की ती बावळ्या (अॅडोलोसेंट) वयात आहे म्हणून अशी उच्छृंखल, स्वतंत्र, बेफिकीर आहे. पण ती गाव सोडते ते या बेफिकीरीमुळे किंवा मनाच्या स्वतंत्रपणामुळे नाही, तर परिस्थितीच्या दबावाने. पुढे मुंबईला गेल्यावर पुन्हा ती एकदम स्वच्छंदी बनते. माणसाचे परिस्थितीनुसार वागणे समजू शकते. पण म्हणून

त्याचा मूळ स्वभाव दबत नाही. पण येथे चित्रपट-नायिकेचा मूळ स्वभाव कधीच नीटपणे प्रस्थापित होत नाही. मग पहायला मिळते ते एका प्रवाहपतीत स्त्रीचे जीवन. तेही असायला हरकत नाही. पण या चित्रपटाच्या प्रारंभी अपेक्षा वेगळ्याच करून देण्यात येतात व तेथेच गाडे फसते.

अशा व्यक्तिजीवनाची कथा पडद्यावर आणण्याचे काम दिग्दर्शक गोविंद सरैय्या यांनी केले आहे. पण कथेतील दोषांबाबत त्यांना दोषही कोणाला देता येणार नाही. कारण चित्रपटाच्या कथालेखनाची जबाबदारीही त्यांनीच उचलली आहे. पण सरैय्या लेखनात फसले असले तरी दिग्दर्शनातील त्यांचे कौशल्य या चित्रपटातही जाणवते. चित्रपटाच्या सुरुवातीलाच नायिकेच्या निवेदनातून पात्रांची ओळख करून देण्याची कल्पना, त्यानंतर सबंध चित्रपटातच मधून मधून निवेदन देण्याचा व काही ठिकाणी चित्रे गोठविण्याचा प्रकार चित्रपटाच्या शैलीशी सुसंगत व रसपरिपोष वाढविणारा आहे. प्रियावर बलात्कार होतो त्यावेळपूर्वीची वातावरणनिर्मितीही त्यांनी बरीच समाधानकारक केली आहे. मुख्य म्हणजे त्यात भडकपणा नाही.

या चित्रपटाच्या नायिकेचे काम करायला तनुजाइतकी लायक अभिनेत्रीच नाही. सदोष व्यक्तिरेखाटनाचा परिणाम तिच्या अभिनयावर झाला असला तरी एका स्वतंत्र तरुणीची बंगुमानवृत्ती तिने वेळोवेळी, प्रसंगाप्रसंगातून चांगल्या प्रकारे आविष्कृत केली आहे. तिच्या प्रेमात पडलेला सायकलवाला झाला आहे संजीवकुमार. त्याने आपली भूमिका समजावून घेऊन तनुजाला ठीकठाक साथ दिली आहे. कल्याणजी-आनंदजी यांचे संगीत व बाकी तांत्रिक गोष्टी समाधानकारक आहेत.

'प्रिया' हा चित्रपट मोठा वाखाणण्यासारखा नसला तरी त्यातील वेगळा विषय, वेगळ्या प्रकारे त्याची हाताळणी यामुळे तो वैशिष्ट्यपूर्ण नक्कीच आहे. 'सरस्वतीचंद्र'मुळे दिग्दर्शक गोविंद सरैय्या यांच्याविषयी निर्माण झालेल्या अपेक्षा हा चित्रपट निश्चितच वाढवतो. पण तेवढे कथालेखनाचे काम त्यांनी योग्य त्या माणसाकडच सुपूर्त करावे हे बरे.

—मुंबईकर



पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

# अंदाज

३ ते ९ ऑक्टोबर १९७०

मेष : मागील आठवड्यापेक्षा सांपत्तिक स्थिती चांगली राहील. भागिदार व पत्नीकडून सर्व बाबतीत सहाय्य मिळण्याचा शुभयोग आहे. सरकारी कामाकरता प्रवास घडण्याचा योग आहे. त्यात प्रतिपक्षाकडून सुद्धा मदत मिळेल.

विद्याभ्यासात अडथळे येतील. मेकॅनिकलच्या विद्यार्थ्यांना ह्या अनुभव जास्त येईल. सोमवार – मंगळवारी सुखात व्यत्यय येईल. मानसिक शांतता बिघडेल. धंदा-व्यवसाय चांगला चालेल. वाहतूक एजंट, बिल्डींगचे काम करणारे, कोळशाचे व्यापारी यांना फायदा होईल. संतती विरोध करील.

चंद्राचे भ्रमण ८।९।१० स्थानातून आहे. ते मिश्रफल देईल. बुधवार – गुरुवार यशदायी आहेत. शुक्रवारी अचानक धनलाभ होण्याचा योग आहे. बौद्धिक व्यवसाय करणाऱ्यांना शुक्रवार फारच चांगला आहे. शुभ तारखा ६।७।८।९.

वृषभ : धनस्थितीत चांगलीच सुधारणा होण्याचा योग आहे. गुरु – शुक्र सर्व बाजूंनी शुभ घटना घडवून आणतील. वैयक्तिक मोठेपणा व मानसन्मान होण्याचा योग आहे. सरकारी नोकरांना त्यांचे कामात अविश्रांत श्रम घ्यावे लागतील. नोकरीत नको असलेल्या जागी बदली होण्याचा जोरदार संभव शुक्रवारी आहे.

विद्येत यश येईल. बौद्धिक व्यवसाय करणारे साहित्यिक, लेखक, प्रकाशक यांना प्रगतिपथावर नेणारा आठवडा आहे. इंडिकेटची राशी आहे. राजकारणात पडलेल्या व्यक्तींना यश आहे.

७।८।९ या घरातले चंद्राचे भ्रमण मिश्र फलदायी आहे. रविवार – सोमवार घरातील मंडळींसह आनंदात जातील. बुधवार – गुरुवार प्रवास टाळावा. भावंडांकडून त्रासदायक वागणूक होईल. शुभ तारखा ३।४।५।६।९.

मिथुन : शरीरप्रकृती चांगली राहील. घराच्या बाबतीत काही तरी शुभ घटना घडून येईल. सरकारकडून मिळणारी राहण्याची जागा या आठवड्यात हातात येईल. या दृष्टीने बुधवार – गुरुवार चांगले आहेत. मित्रांकडून होणारी पैशाची मदत अपेक्षेपेक्षा फारच कमी होण्याचा संभव आहे.

विद्याभ्यासात सर्व प्रकारची प्रगती होईल. विद्यार्थ्यांना परदेशगमनाकरता सरकारी मदत मिळण्याचा जोरदार योग आहे. अचानक धनलाभाला बुधवार – गुरुवार चांगले आहेत. भावंडांकडून शुक्रवारी मानसिक स्वास्थ्य बिघडविणारी वागणूक होईल. व्यापारधंद्यात विशेषकरून साहित्य, चित्रकला, नाट्यकला इत्यादी कलावंताना जनतेपुढे येण्याचे योग आहेत.

चंद्राचे भ्रमण ६।७।८ स्थानातून आहे ते तितकेसे चांगले नाही. मानसिक कोंडमारा होण्याचा प्रसंग आणणाऱ्या घटना घडतील. शुभ तारखा ६।७।८.

कर्क : धनस्थिती ढासळली तरी आपण धीर सोडू नका. संततीकरता बरीच रक्कम खर्च करावी लागेल. सामाजिक दर्जा सांभाळण्याकरता हा खर्च करावा लागेल. मंगळवार—बुधवार घरात काही तरी विवाहासारख्या शुभ समारंभाची तयारी होईल. सरकारी कामात संपूर्ण यशःप्राप्ती होईल. वरच्या दर्जाच्या सरकारी नोकरांना extension मिळण्याचा योग आहे.

विद्याभ्यासात अनेक अडचणी निर्माण होतील. सायन्सच्या विद्यार्थ्यांना हा अनुभव येईल. मातुल घराण्याकडून बुधवारी आर्थिक मदत मिळेल. शुक्रवार संपूर्ण दिवस घरातील मंडळींसह आनंदात जाईल.

चंद्राचे भ्रमण ५।६।७ स्थानातून आहे ते चांगले आहे. शिवाय चंद्र लग्नेश आहे सर्व आठवडा शुभ आहे. केंद्रातील गुरु—शुक्र शेवटी सर्व अडचणी नाहीशा करतील.

सिंह : धनस्थिती चांगलीच सुधारण्याची शक्यता आहे. स्थावराबद्दलचे व्यवहार मित्रांच्या मदतीने पार पडतील. उष्णतेच्या विकारापासून त्रास होईल. प्रवास योग येईल. त्यात सहज होणाऱ्या ओळखीचे कायमच्या परिचयात रूपांतर होईल.

विद्याभ्यासात चांगली प्रगती होईल. साहित्यिक, कलावंत यांना समाजापुढे येण्याला उत्तम संधी मिळेल. हातून तत्त्वज्ञानविषयक लिखाण सहज होईल. पत्रकाराला चांगले क्षेत्र मिळेल. संततीचा भाग्योदय होईल. सोमवारी घरच्या मंडळींसह दिवस आनंदात जाईल.

चंद्राचे भ्रमण ४।५।६ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. अचानक धनलाभाचा योग बुधवारी आहे. मामाकडील अगर सासुरवाडची माणसे येऊन शुक्रवार आनंदात जाईल. शुभ तारखा ४।५।६।९.

कन्या : धनस्थानाची परिस्थिती फारच चांगली राहील. गुरु—शुक्र युती संपत्ती मिळविण्याचे अनेक मोके उत्पन्न करील. अचानक धनलाभ होईल. सार्वजनिक कामात खूपच मानमरातब मिळेल. प्रकाशक आपला धंदा खूपच वाढवू शकतील. सरकारकडूनही प्रोत्साहन मिळण्याचा संभव आहे.

विद्याभ्यासात अडथळे आले तरी प्रगती होत राहील. शास्त्रीय अभ्यासक्रमात असलेल्या विद्यार्थ्यांना याचा अनुभव जास्त येईल. संततीच्या आजारपणाकरता पैसा खर्चावा लागेल. परदेशात असलेल्या मुलांना यशदायी दिवस आहेत. वकिलातीत काम करणारांना मानसन्मान मिळेल.

चंद्राचे भ्रमण ३।४।५ या स्थानातुन आहे. ते चांगले आहे. शनिवारी मित्रमंडळींकडून सत्कार केला जाईल. व स्थावराबद्दलचे व्यवहार सुलभतेने उलगडतील. शुभ तारखा ३।५।७।९.

तूळ : सांपत्तिक स्थिती चांगली सुधारेल. पत्नीच्या माहेराकडून आणि मित्रांकडन धार्मिक उत्सवाकरता आमंत्रण येईल. त्यात भाग घ्यावा लागेल. आर्थिक

बाबतीत थोडासा विचार करणे शेवटच्या घटकेला भाग पडेल. बुधवार–गुरुवार प्रवासयोग आहे. भावंडांकडून सर्व तऱ्हेची मदत मिळेल.

विद्याभ्यासात थोड्या अडचणी निर्माण होतील. मुलांचे शिक्षणविषयक धोरण बदलावे लागेल. धंदा–व्यवसाय चांगला चालेल. स्वतःच्या हट्टी स्वभावामुळे नुकसान होण्याचा प्रसंग येईल. पण लग्नातले गुरु-शुक्र अगदी शेवटच्या घटकेला सावरून धरतील.

चंद्राचे भ्रमण २।३।४ या स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे. शनिवार–रविवार मानमान्यता वाढेल. सोमवार–मंगळवार व्यवसायात भरघोस नफा होण्याचा शुभयोग आहे. शुक्रवारी घरात आनंददायक समारंभ घडून येईल. सर्व आठवडाच शुभ आहे.

वृश्चिक : आठवड्याच्या सुरुवातीपासून पैशाच्या पाकिटावर ताण पडण्याला सुरुवात होईल. शनिवारी अनपेक्षित प्रवास घडेल व त्यात संततीकरता आणि पत्नीकरता बरीच रक्कम खर्ची पडेल. रविवार–सोमवार भावंडांकडून आर्थिक मदत मागितली जाईल. विशेषतः धाकट्या बहिणीकडून हा योग येईल.

आतड्याच्या विकाराने अगर मूळव्याधीने आजारी पडण्याचा संभव आहे. मित्रमंडळींकडून सर्व प्रकारची मदत होईल. अशाही परिस्थितीत सार्वजनिक कामात शुक्रवारी भाग घ्यावा लागेल, त्यांत यशवंत होता येईल.

चंद्राचे भ्रमण १।२।३ स्थानातून आहे ते चांगलेच आहे. चंद्र भाग्येश आहे. शुक्रवारी पराक्रम घडून येईल. शुभ तारखा ४।५।७।९.

धन : या आठवड्याचा सुरुवातीपासूनच पैशाचा ओघ सुरू होईल. शनिवारी बुद्धीच्या जोरावर भाग्योदय होण्याचा व भरपूर आर्थिक लाभ होण्याचा योग आहे. सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. सरकारी अगर निमसरकारी संस्थांकडून मानसन्मान केला जाईल. बौद्धिक व्यवसायातील लोकांना उत्कर्षाचा काल आहे.

विद्याभ्यासात संपूर्ण यश येणे कठीण आहे. काही अनपेक्षित अडचणी येतील. ३६ च्या पुढील व्यक्तींना हा अनुभव जास्त येईल. सोमवार-मंगळवारी अचानक धन-लाभ होईल. संततीकडून घराण्याचा मान वाढविण्यासारख्या घटना घडतील. एखाद्या मोठ्या धंद्याचा उपक्रम केला तर त्यात चांगला जम बसण्याचा योग नजिकच्या काळात येईल. हातात घेतलेला कोणताही व्यवसाय प्रगतिपथावर जाईल.

चंद्राचे भ्रमण १२।१।२ या स्थानातून आहे. ते मिश्रफलदायी आहे. रवी-चंद्रांना ६।८।१२ स्थानांचा दोष नसतो. शिवाय त्यावर मंगळ पाहतो आहे. धार्मिकवृत्ती वाढेल. सर्व आठवडाच शुभफलदायी आहे.

मकर : या आठवड्यात धनस्थितीत एकदम अनपेक्षित सुधारणा होईल. शनिवारी भागिदारांमुळे अचानक लाभ होईल. दशमातील गुरु-शुक्र मानसन्मान मिळवून देतील. नोकरी करणारांना वरची जागा मिळण्याचा शुभयोग आहे. राहण्याच्या जागेचा

प्रश्न बरेच दिवस अडून पडला असेल त्यात मनासारखा निकाल बुधवारी–गुरुवारी लागेल.

विद्याभ्यासात भरघोस यश:प्राप्ती देणारा काल आहे. उद्योगधंदा भरभराटीला येण्याच्या मार्गावर आहे. उत्साहाने पाऊल पुढे टाकावे. नाटचकलाकार, पेंटर्स, फॅन्सी-वस्तूंचे व्यापारी वगैरे लोकांना आठवडा सपूर्ण यशस्वी करणारा आहे. ही राशी सिंडिकेटची आहे. हे लोक फार चंचल वृत्तीचे असतात. घरगुती जीवनात संपूर्ण यश.

चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानातून आहे, ते मिश्रफलदायी आहे. बुधवार–गुरुवार घरात थोडासा मतभेद होईल. शुभ तारखा ३।४।५।८।९.

कुंभ : या आठवडयात धनस्थितीत लक्षात येण्याजोगी सुधारणा घडून येईल. शनिवारी लॉटरीचे तिकीट घेण्याला दिवस चांगला आहे. तिकिटाचा नंबर १, २, ७, ८ यांचा बनलेला असावा. प्रवासाचा योग बुधवार–गुरुवारी येईल. तो शक्य तितका साधावा. कायम स्वरूपाचा फायदा होण्याचा शुभ योग आहे.

विद्याभ्यासात भरपूर यश:प्राप्ती होईल. धार्मिक बाबतीत कार्य करण्याचा योग जरूर साधा. बौद्धिक कार्याला समाजाकडून सहानुभूतिपूर्वक चालना मिळेल. आध्यात्मिक विषयावर लिखाण करण्याला फार चांगले दिवस आहेत संततीचा सर्व बाजूंनी उत्कर्ष होईल, पण व्यक्तिशः मतभेद होण्याचा संभव आहे. सरकारी कामे थोडी पुढे ढकलावी. सिंडिकेटची राशी आहे. खाजगी जीवनात संपूर्ण यश देणारा आठवडा आहे.

चंद्राचे भ्रमण १०।११।१२ स्थानातून आहे. ते चांगले आहे. प्रत्यक्ष क्षेत्रात पाऊल पुढेच पडेल. फक्त स्वभावात राग अनावर होण्याचा योग आहे. त्यावर चंद्रदर्शन–अर्थात शंकराचे दर्शन हा उपाय आहे. सर्व सप्ताह शुभफलदायी आहे.

**मीन :** या आठवडयाच्या सुरुवातीलाच–शनिवारी आर्थिक प्रश्न सुटण्याजोगी परिस्थिती निर्माण होईल. अचानक मित्रांकडून सर्व प्रकारची मदत होईल शत्रूंचा नाश होईल. आत्मघातकी विचार मनात प्रबळ होतील. वाचा शुद्धी कमी होण्याची शक्यता आहे. जपूनच वचने द्यावी, अगर घ्यावी. गृहसौख्य चांगले लाभेल. राहण्याच्या जागेचे प्रश्न समाधानकारक रीतीने सुटतील.

विद्याभ्यासात यश:प्राप्ती होईल. मुले सर्व आठवडाभर मनासारखी वागतील. सरकारी कामात यश मिळेल. शनिवारी कुटुंबातील व्यक्ती आजारी पडेल. ३२ ते ३६ वयातील व्यक्तींना भाग्योदयकारक गोष्टी घडण्याचा योग आहे. प्रतिष्ठेला थोडा कमीपणा येईल. भावंडांकडून त्रासदायक वर्तन घडेल. मित्र, भागिदार, पत्नी प्रत्येक बाबतीत सिद्धहस्त राहतील.

चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. सर्व आठवडाच शुभफलदायी आहे.

□ □ □

**राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M-H 649




"होय ! तुमच्या स्टेशनात खूप सुधारणा व्हायला हव्यात हे आम्हाला एकदम पटलं आहे...न् तातडीचा उपाय म्हणून आम्ही आताच हुकूम काढला आहे की, स्टेशनाचं इंग्रजी नाव ताबडतोब बदलून टाकून त्याऐवजी शुद्ध भारतीय नाव ठेवा..."